
# ज्ञानव्रती




आचार्य शिवमुनी (शं. भी. मयाचारी)


# गौरव ग्रंथ

संपादक -

डॉ.नयनकुमार विशारद




धन्य ते माता पिता, ज्यांनी आपल्या प्रिय पुत्राचे जीवन घडविले.




युवावस्थेतील विद्यार्थी
**ब्र.शंकर मयाचारी**



प्रौढ वयात शिक्षक
**मयाचारी गुरुजी**



गुरुकुलाचे आचार्य
**शिवमुनिजी**





जीवनभर मोलाचे साथ देणाऱ्या धर्मपत्नी सौ.मंगलादेवी समवेत आचार्य शिवमुनिजी

# ज्ञानव्रती

## आचार्य शिवमुनी(शं.भी. मयाचारी)

## गौरव ग्रंथ

---

**- संपादक -**

प्रा.डॉ.नयनकुमार विशारद

---

**- प्रकाशक -**

आचार्य शिवमुनिजी गौरव समिती

आर्यसमाज औराद ता.उमरगा

जि.धाराशिव (उस्मानाबाद)

---

- **ज्ञानव्रती (आचार्य शिवमुनिजी) गौरव ग्रंथ**

- रविवार, चैत्र कृ. ७,
  शके १९३३/विक्रम सं. २०६८
  दि.२४ एप्रिल २०११

- **प्रकाशक:**
  आचार्य शिवमुनिजी गौरव समिती,
  आर्य समाज,औराद ता.उमरगा
  जि.धाराशिव (उस्मानाबाद)

- **पत्ता-**
  आचार्य शिवमुनिजी (शं.भी.मयाचारी),
  मु.पो.औराद, ता.उमरगा
  जि.धाराशिव (उस्मानाबाद)
  भ्रमणध्वनी : ०९४०३०५०४६५/
  दूरध्वनी:०२४७५-२८७०६४

- प्रथम आवृत्ती : २०११
- प्रतींची संख्या -७००
- © सर्व हक्क प्रकाशकाधीन

- **मुद्रक :**
  बाहेती ऑफसेट प्रिन्टर्स,
  भवानीनगर, ता.परळी-वै.
  दूरध्वनी: ०२४४६-२२२६७८

## दिव्यत्वाची जेथ प्रचिती,
## तेथे कर माझे जुळती।



हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील

पहिले बलिदानी

**आर्यवीर हुतात्मा पं.वेदप्रकाश (गुंजोटी)**

यांच्या पावन स्मृतीस

हा गौरव ग्रंथ

समर्पित

# अनुक्रमणिका


१) संपादकीयम् ........................................अ
२) आशीर्वाद ........................................ आ
३) शुभेच्छा संदेश ........................................ इ
४) सचित्र जीवनदर्शन ........................................ ई
५) आदर्श समाज शिक्षक ........................................ १
६) निर्मळ मनाचे सोज्ज्वळ 'गुरूजी' ........................ ४
७) महान कर्मयोगी शिवमुनिजी ........................ ५
८) शिवमुनिजींना मानाचा मुजरा (कविता).................. ६
९) हमारे सुयोग्य साथी ........................................ ८
१०) पिता की छवि........................................ ९
११) शिवमुनिजी.. भूषण धर्माला (कविता).................. ११
१२) माझे दैवत शिवमुनिजी ........................................१२
१३) देवतातुल्य गुरु (कविता)........................ १८
१४) आदर्श व्यक्तित्त्व-शिवमुनिजी ........................ १९
१५) शिवमुनिजींच्या सहवासात ........................................२१
१६) शिवमुनिजी-वृतस्थ जीवन ........................ २२
१७) आचार्यजी-कृतार्थ जीवन ........................ २७
१८) आजोळची मायाळू सावली ........................ २८
१९) सद्गुणांचे आगर शिवमुनिजी ........................ २९
२०) आमचे शिल्पकार ........................................३१
१९) आमचे आवडते गुरूजी ........................................ ३२
२०) प्रेरणादायी दीपस्तंभ ........................................ ३३
२१) आचार्य देवो भव! ........................................३६
२२) गुरूदेव की छत्रछाया में ........................................३७
२३) अमृत महोत्सव-कार्यक्रम व्रत्तांत ........................ ३९
२४) कार्यक्रम चित्रदर्शन ........................................४३
२५) शिवमुनिजींची अभिनन्दन पत्रे ........................................४९
२६) वंशावली ........................................५३

# संपादकीयम्

**कृ**तिशील ज्ञान व सच्चारित्र्य या दोन गोष्टी लाभणे, ही फारच भाग्याची गोष्ट. कारण या दोन्हींच्या सुरेख संगमामुळे तो व्यक्ती समाजात नवनिर्मितीची बीजे रोवू शकतो व आपल्या पवित्र आचरणामुळे समाजाला दिशा देऊ शकतो. अशा पुण्यवंतांमध्ये आचार्य शिवमुनिजी एक आहेत.

आपले संबंध आयुष्य विद्यादानात घालविणारे ते एक हाडाचे शिक्षक. विद्यार्थी हेच दैवत मानून त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अहोरात्र देह झिजविणारे मयाचारी गुरूजीं हे केवळ घर ते शाळा व शाळा ते घर या पर्यंतच मर्यादित राहीले नाहीत, तर समाज व राष्ट्राच्या उभारणीत स्वत:ला वाहून घेणारे सच्चे समाजशिक्षक ठरले. साधारण कुटुंबात जन्म व शारीरिक अपंगत्व असतांना देखील अंतर्मनातील परोपकाराची भावना व समाजकार्याची ओढ त्यांना शांत बसू दिली नाही. म्हणूनच त्यांच्या जीवनाचा प्रवास प्रेरणाप्रद आहे.

शिक्षकी पेशातून निवृत्त झाल्यानंतर आर्ष विद्येच्या प्रसारात जीवन समर्पित करणाऱ्या आचार्यजींचा लौकिक काही कमी नाही. आजीवन ज्ञानदानाचा, समाजसेवेचा व राष्ट्र घडविण्याचा वसा घेतलेले आचार्य शिवमुनिजी हे खऱ्या अर्थाने आजच्या शिक्षण क्षेत्रासाठी नवा आदर्श ठरतात. अशा महात्म्याच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने अमृतमहोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त गौरव समितीने एका छोट्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्याचे ठरविले. आचार्यजींच्या अनेक शिष्यांनी लेख व कविता पाठवून या ग्रंथाला पूर्णत्त्व प्रदान केले. जीवनभर ज्ञानदानाचे व्रत धारण करण्यात आचार्य शिवमुनिजी तत्पर राहीले. त्यामुळेच या गौरवग्रंथास **'ज्ञानवृती'** असे शीर्षक दिले आहे.

प्रकाशन कार्यात सर्वश्री रामरावजी सनातन, तानाजी शास्त्री, लक्ष्मणराव आर्य आदींनी सहकार्य केले. तसेच मुद्रण कार्यात परळीतील बाहेती ऑफसेट प्रिंटर्सचे संचालक श्री बद्रीनारायणजी बाहेती व त्यांच्या सहकार्याने भरपूर कष्ट घेतले. टाइपिंग (डी.टी.पी.) कार्यात शेख अझहर यांनी अहर्निश परिश्रम घेऊन या ग्रंथास पूर्णत्व प्रदान केले. त्याबरोबरच आदरणीय डॉ. ब्रह्ममुनिजी यांची प्रेरणा हा ग्रंथ पूर्ण होण्यास अतिशय मोलाची ठरली. यास्तव वरील सर्वांचे मन:पूर्वक आभार व धन्यवाद!

या ग्रंथाच्या माध्यमाने वाचकवृंद आचार्यजींच्या आदर्श जीवन व कार्यापासून प्रेरणा घेतील व या ग्रंथाचे स्वागत करतील, ही अपेक्षा.

– डॉ. नयनकुमार विशारद

## शुभेच्छा संदेश

**(१)**

**गुरूकुल महाविद्यालय,**
**आमसेना (उडीसा)**

यह जानकर अत्यधिक प्रसन्नता हुई कि आचार्य शिवमुनिजी का अमृतमहोत्सव मनाया जा रहा है। मुनिजी का जीवन समर्पण, सेवा व त्याग से ओतप्रोत रहा है। उनके इन्हीं सद्‌गुणों बल पर महाराष्ट्र का गुरूकुल प्रगति कर रहा है। हमने भी आमसेना गुरुकुल की ओर से उनका सम्मान किया था। तब उन्होंने सम्मान के रुप में प्राप्त धनराशि आर्य समाज के प्रचार के लिए अर्पित की थी। आपका त्यागपूर्ण जीवन आनेवाली पीढी के लिए प्रेरणाप्रद रहेगा। इस अवसर पर हम आचार्यजी के उत्तम आरोग्य व दीर्घायु की कामना करते हैं।

**भवदीय**
**धर्मानन्द सरस्वती**

---

**(२)**

**परोपकारिणी सभा,**
**अजमेर-(राजस्थान)**

दक्षिण भारत में पू.श्रद्‌धानन्दजी के अनेक शिष्य आर्य समाज की विचारधारा को फैलाने में सक्रिय भूमिका निभा रहे हैं। अध्यापनसेवा से निवृत्त होकर अपना समग्र जीवन गुरूकुल परली को समर्पित करनेवाले आचार्य शिवमुनिजी उन्हीं शिष्यों में से एक हैं। उनके अमृत महोत्सव के उपलक्ष्य में गौरव ग्रंथ का प्रकाशन किया जा रहा है, यह हर्ष का विषय है। आशा है इस ग्रंथ में प्रकाशित लेखसामग्री को पढकर पाठकवृंद नई प्रेरणा प्राप्त करेंगें। मै आचार्यजी के स्वस्थ जीवन व पूर्ण आयु की कामना करता हूँ।

**आपका शुभाकांक्षी**
**धर्मवीर (मंत्री)**

---


**(३)**

**महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा**
**परळी-वैजनाथ**

प्रांतीय सभेचे माजी मंत्री व वैदिक धर्माच्या प्रचारात मोलाची भूमिका बजावणारे आचार्य श्री शिवमुनिजी यांचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त त्यांच्या प्रेरणादायी जीवन व कार्यावर प्रकाश टाकणारा गौरव ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. संपादक प्रा.डॉ.नयनकुमार विशारद यांनी मोठ्या प्रयत्नांनी हा ग्रंथ संपादित करुन आचार्यजींचे मौलिक कार्य जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. नव्या पिढीसाठी हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, अशी आशा करतो. आचार्यजींच्या दीर्घायुरारोग्यासाठी शुभ कामना!

**आपला शुभेच्छुक**
**राजेंद्र दिवे (मंत्री)**

धन्य ते गुरूवर्य, ज्यांच्या प्रेरणेने
शिवमुनींचे जीवन उजळले ....



**स्वामी श्रद्धानन्दजी सरस्वती**
**(पू.हरिश्चंद्र गुरूजी)**

---

**जीवश्च कण्ठश्च मित्र**



डॉ. ब्रह्ममुनिजी

**गुरूकुलातील सहकारी**



श्री विज्ञानमुनिजी



श्री सोममुनिजी

# आचार्य शिवमुनिजी-सचित्र जीवनदर्शन




आर्य जगत् के वीतराग संन्यासी स्वामी सर्वानंदजी, विद्वान प्रा.राजेन्द्र **'जिज्ञासु'**, स्वामी सम्पूर्णानंदजी, महात्मा त्यागमुनिजी, स्वामी श्रद्धानंदजी, श्री वेलानीजी आदियों के साथ आचार्य शिवमुनिजी ।




महाराष्ट्र की वानप्रस्थी मंडली के साथ शिवमुनिजी

# आचार्य शिवमुनिजी–सचित्र जीवनदर्शन



प्रान्तीय सभा द्वारा आयोजित राज्यस्तरीय विद्यालयीन वक्तृत्त्व प्रतियोगिता में विजेत्री छात्रा को पुरस्कार प्रदान करते हुए सभामंत्री शिवमुनिजी



राज्यस्तरीय बाल संस्कार शिविर में बच्चों को प्रमाणपत्र वितरीत करते हुए आचार्य शिवमुनिजी। साथ में हैं उग्रसेन राठौर प्रा.अर्जुनराव सोमवंशी, हरिसिंहजी आर्य, हालिंगे आदि।



अपने खेत में परिवार के साथ यज्ञ करते हुए आचार्यजी



लगभग पंद्रह साल तक शिवमुनिजी के घर व खेती में सेवाकार्य करने वाले श्री टिकाराम राठोड (डोन्नूर तांडा ता.आलंद जि.गुलबर्गा) मेहनत व पुरूषार्थ के बल पर बहुत बडे धनी बन गये हैं। राठोड दम्पती के साथ शिवमुनिजी एवं श्रीमती मंगला देवी।



मयाचारी गुरूजी (शिवमुनिजी) से शिक्षा पाकर अध्यापिका बनीं छात्रा सौ.सुमन व्यंकटराव पवार (नाईचाकुर) द्वारा अपने गुरवर्य का सम्मान ।



आचार्य शिवमुनिजी अमृत महोत्सव के उपलक्ष्य में आयोजित 'वेद पारायण यज्ञ' का दृश्य।

# आदर्श समाज शिक्षक पू.शिवमुनिजी

**- शि.मा.जाधव (औरादकर)**

**धा**राशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील औराद नावाचे अगदी शे-पाचशे उंबऱ्याचे छोटेसे खेडे, पण तिथे जन्मले आहेत अनेक ध्येयवेडे. स्वामी श्रद्धानंदजी (हरिश्चंद्र गुरूजी), श्री विज्ञानमुनिजी (श्री आण्णाराव पाटील), श्री डॉ, ब्रह्ममुनिजी (डॉ.सु.ब.काळे) व त्यापैकीच एक पूज्य आचार्य शिवमुनिजी (श्री शंकरराव मयाचारी गुरूजी) होत.

श्री शंकरराव भीमराव मयाचारी यांचा जन्म दि.२१ सप्टेंबर १९३३ रोजी औराद येथे एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणीच आईचे आणि त्या पाठोपाठ कांही वर्षानंतर वडिलांचेही छत्र हरपले. बालपणीच पोलिओ होऊन एक पाय कमकुवत झाला. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व शारीरिक प्रतिकूलतेची तमा न बाळगता त्यांनी श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी ता. उमरगा येथून मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले व पुढील उच्च शिक्षणासाठी हैद्राबादचे उस्मानिया विद्यापीठ गाठले. बी.ए.बी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी श्रीकृष्ण विद्यालय, गुंजोटी येथे शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली.

पूज्य श्री हरिश्चंद्र गुरूजी (स्वामी श्रद्धानंदजी) औरादचे रहिवासी असल्यामुळे त्यांचे सान्निध्य श्री शंकरराव मयाचारी गुरूजींना सहज लाभले. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना वैदिक धर्म, तत्वज्ञान, आसन, प्राणायाम, ध्यान धारणा इ.बाबींचे ज्ञान प्राप्त झाले. वडिलांकडून मिळालेले बाळकडू व पूज्य हरिश्चंद्र गुरूजींकडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे श्री मयाचारी गुरूजी आर्य समाज मंदिरात होणाऱ्या यज्ञाच्या कार्यक्रमास नियमित जाऊ लागले. सत्संग, चांगल्या ग्रंथाचे वाचन व श्री हरिश्चंद्र गुरूजींची शिकवण यामुळे गुरूजी लहानपणापासून निर्व्यसनी, सदाचारी व सत्प्रवृत्तीयुक्त बनले.

औराद पासून ३ कि.मी. अंतरावर गुंजोटी हे सुधारलेले खेडे आहे. त्या ठिकाणी इ.स.१९५७ ते १९९१ पर्यंत सतत ३४ वर्षे मयाचारी गुरूजींनी शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य अतिशय निष्ठापूर्वक केले आहे. गुंजोटी येथे शिक्षक म्हणून सेवा करत असतांना त्यांच्या मार्गदर्शनाचा व वर्तनाचा फार मोठा प्रभाव माझ्या जीवनावर पडलेला आहे. कालांतराने मी बी.ए., बी.एड. होऊन गुंजोटीच्या शाळेत १९८५ ते १९९१ पर्यंत त्यांच्या समवेत सहकारी शिक्षक म्हणूनही काम केलेले

आहे. त्यावेळीही त्यांच्या आचार-विचारांचा प्रभाव माझ्यावर पडल्यामुळे निश्चितच फायदा झालेला आहे. पुढे परळीतील गुरूकुलात व आजकाल ते आजारपणामुळे गावात असतांना सुद्धा मला त्यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

श्री मयाचारी गुरूजींच्या प्रयत्नामुळेच गुंजोटीच्या शाळेत संस्कृत विषय सुरू झाला. केवळ अभ्यासक्रम संपविणे एवढा मर्यादित हेतू त्यांचा नव्हता, तर विषय अध्यापनाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून सखोल मार्गदर्शन करणे व विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणे याकडे त्यांचे विशेष लक्ष असे. हिन्दी व संस्कृत या विषयाचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री मयाचारी गुरूजींनी काम केले आहे. शाळेत थोरामोठयांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करतांना गुरूजींचे सखोल मार्गदर्शन आम्हाला मिळायचे. महापुरूषांचे चरित्र ते समजावून सांगायचे, **'मुलांनो! महापुरूषांच्या केवळ चित्राची (फोटोची) पूजा करून नका, चरित्राची पूजा करा.'** श्री मयाचारी गुरूजी केवळ शाळेतील घड्याळी शिक्षक नव्हते तर ते एक **'समाज शिक्षक'** होते. शाळेतील कोणत्याही उपक्रमासाठी शाळे व्यतिरिक्त ते जादा वेळ आनंदाने देत असत.

शाळेतील कामे सांभाळून सन् १९६० पासून १९९३ पर्यंत आर्य समाज औरादचे मंत्री म्हणून त्यांनी निष्ठापूर्वक काम सांभाळले आहे. साप्ताहिक सत्संगाला जास्तीत जास्त मुले-मुली कसे उपस्थित राहतील, या दृष्टीने ते नेहमी प्रयत्न करायचे. नामकरण संस्कार, विवाह संस्कार, अन्त्यसंस्कार प्रसंगी निरोप मिळाल्याबरोबर सर्व सांसारिक कामे बाजूला ठेवून ठरलेल्या ठिकाणी ते आजही उपस्थित होतात. यज्ञ, भजन व संस्कार विधीचे पुस्तक, यज्ञोपवीत इ.साहित्याची त्यांची एक विशिष्ट रंगाची पिशवी होती. ती पिशवी नेहमीच तयार ठेवायचे. त्यांच्या या तत्परतेमुळे औरादमधील ९० टक्के विवाह आजही वैदिक पद्धतीनेच होतात. त्यांच्या कामाची चिकाटी पाहुन महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे उपमंत्री, वेदप्रचार अधिष्ठाता व मंत्री म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

शालेय व महाविद्यालयीन अध्यापन सेवेतून निवृत्त झाल्यानंतर दि.२० मार्च १९९६ रोजी परळी येथे श्री शंकरराव मयाचारी गुरूजींनी वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला व ते 'शिवमुनी' बनले. गुरूकुलात प्रधानाचार्य म्हणून त्यांनी चांगल्याप्रकारे

कार्य केले.

वयाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या पूज्य शिवमुनीजींच्या कार्याचा यथोचित गौरव करण्यासाठी त्यांची जन्मभूमी औराद येथे अमृत महोत्सव साजरा होत आहे. या निमित्त त्यांना उत्तम आयुरारोग्य लाभो, हीच प्रभूचरणी विनम्र प्रार्थना करतो!

**विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन।**
**स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।**

**- उपशिक्षणाधिकारी,**
**प्राथमिक विभाग,**
**जि.प.उस्मानाबाद**

**(काव्यसुधा)**

# आदर्श गुरूजी

**- ध.मा.पवार (निवृत्त शिक्षक)**

अभिवादन मयाचारींना। आनंद झाला सकलांना ।। धृ ।।
दीपस्तंभा परी जीवन त्यांचे। कोड कौतुक अपत्याचे ।
शिक्षकी पेशा कर्तव्याचा ।। चंदनी सुगंध दरवळला ।।१।।
मानवी जीवन आश्रम चार। सद्यस्थितीला वानप्रस्थावर ।
सत्य विजयी अध्यात्मावर। वंदिले आर्य समाजाला ।।२।।
दुडूदुडू चाले हाती धरती। शिष्य गणाशी भाग्य देती ।
चंद्रप्रकाशी शामलमूर्ती । लेखनी ज्ञान अमृताला।।३।।
जाती तेथे ते सगळ्यांचे। समाज प्रेमी ना बगळ्यांचे ।
विचारधन ते लाख मोलाचे। मी पण नमितो गुरूजींना ।।४।।
लोकाभिमुख आचरण केले। कटू सत्य गोड बोले ।
शब्द फुलांचे हार गुंफिले। भविष्याचे दीर्घायू शिवमुनींना ।।५।।

**- मु. पो. नाईचाकूर**
**ता. उमरगा, जि. उस्मानाबाद**

# निर्मळ मनाचे सोज्ज्वळ 'गुरूजी'

**- लक्ष्मणराव आर्य(निवृत्त गटशिक्षणाधिकारी)**

**पू.** शिवमुनिर्जींच्या जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास आपणांस अनेक पैलू ठळकपणे दिसून येतात. पूर्वाश्रमीचे मयाचारी गुरूजी म्हणजे संस्कृतचे गाढे अभ्यासक, प्रेमळ शिक्षक. नियमितपणा हा त्यांचा स्थायीभाव. भाषा मधुर, विद्यार्थीहिताची तळमळ, सतत परिश्रमाची तयारी अशा अनेक प्रेरणादायी गुणांमुळे ते **'विद्यार्थीप्रिय अध्यापक'** ठरले. त्यांचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात चमकत आहेत. वैदिक विचारांची बैठक पू.हरिश्चंद्र गुरूजींच्या प्रदीर्घ सहवासाने अधिक दृढ झाली. त्यामुळे अनेक प्रापंचिक जबाबदाऱ्या असतांना देखील वानप्रस्थाश्रमात प्रवेश करण्याचे धाडस केले, हे विशेष. ते नंतर 'शिवमुनी' झाले व पू.ब्रह्म निर्जींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन त्यांनी परळीच्या स्वामी श्रद्धानंद गुरूकुलातील आचार्य पदाची धूरा सांभाळली व ती समर्थपणे पेलली सुद्धा. त्यांच्यामुळे विद्यार्थी शिस्तप्रिय, अभ्यासू झाले. सतत हास्यवदन, प्रेमळ बोलणे, हळुवारपणा, आदरातिथ्य या गुणामुळे येणारा माणूस नकळत त्यांचाच होऊन जातो.

स्वत:ची प्रकृती बरी नसतांना देखील रात्रदिवस गुरूकुलाची काळजी वाहणारी ती ब्रह्मचाऱ्यांची आईच होय. एखादा विद्यार्थी चुकला (वागण्यात) तर त्याला जवळ बोलावून 'अशी चूक का केली रे? पुन्हा ती चूक करू नको', एवढे बोलणे म्हणजेच या मातृहृदयाने केलेली शिक्षा होय. एवढ्याच शिक्षेने विद्यार्थी गार होऊन सुधारतो, हे विशेष. त्यांचे मन नवनीतासारखे निर्मळ आहे. कोणाविषयी ही असूया किंवा दुजाभाव नाही. **'मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनांचे चित्त।।'** त्यांचे बोलणे मोजके, मवाळ, सत्य असते. **'साच आणि मवाळ। मितुले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ अमृताचे।।'** ही ओवी त्यांना तंतोतंत लागू पडते. पू.मुनिर्जींचा अमृत महोत्सव ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. त्यानिमित्ताने आपण त्यांच्या सोज्ज्वळ जीवनाकडे पाहून प्रेरणा घेऊ या. परमेश्वर पू. मुनिर्जींना दीर्घायुष्य देवो व त्याच्याकडून अनेकांना सत्प्रेरणा मिळत राहो आणि समाज, राष्ट्र उज्ज्वल बनो, हीच प्रार्थना! **'दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती.'**

- 'पंच प्रकाश' विद्यानगर, परळी-वैजनाथ जि.बीड
भ्रमनध्वनी - ९४२०२६९९२४

# महान कर्मयोगी - आचार्य शिवमुनि

**- पं. विश्वनाथ शास्त्री**

संसार में प्रत्येक महान आत्मा अपने प्रतिभासम्पन्न सुकर्मों द्वारा युग को प्रभावित करती हैं। ऐसे ही नररत्नों व महान कर्मयोगियों में आदरणीय आचार्य शिवमुनिजी भी एक दिव्यरत्न है। मैं बचपन से आपके जीवनरूपी यज्ञ को देख रहा हूँ। आपकी मानवदेह रूपी यात्रा सुगम एवं सफलतापूर्वक चल रही है। आपका जीवन कर्ममय है। आपके जो मन में है, वह वाणी में होता है और जो वाणी में होता है, वही कर्म में होता है। आपका स्वभाव, शांत और विनम्र है। इसका प्रभाव सभी पर होता है। आपके जीवनरूपी यज्ञ द्वारा कई नौजवानों को राह मिली है। समाज सुधार के कार्यों मे रात-दिन लगकर आपने स्वस्थ समाज बनाया।

आपका जीवन आरम्भ से ही संघर्षमय रहा है। अनेकों कठिनाइयों को हंसते हुए स्वीकार किया है। युवावस्था से लेकर आज तक आपने लगन से वैदिक धर्म का प्रचार-प्रसार तथा लोक कल्याण और मानव निर्माण का कार्य किया है और आज भी कर रहे हैं। श्रीकृष्ण विद्यालय, गुंजोटी में अध्यापन कार्य के साथ ही आप ने औराद ग्रामवासियों के लिए 'आर्य समाज' के माध्यम से सेवा की। स्वामी श्रद्धानन्द गुरूकुल आश्रम परली में आचार्य पद को विभूषित करके पूरी मानवजाति के कल्याण एवं निर्माण में आप तत्पर हैं। धन्य है आपके माता-पिता, जिन्होंने आप जैसा सुपुत्र भारतभू को दिया। आप जैसे कर्मयोगी के जीवन से हमें प्रेरणा मिली है। और आगे भी मिलती रहेगी।

. इस अमृतमहोत्सव के शुभ अवसर पर मैं ईश्वर से प्रार्थना करता हूँ कि वह आपको दीर्घ आयु एवं अच्छा स्वास्थ्य प्रदान करें। आपके तेजस्वी व यशस्वी जीवन की उत्तम कामना करता हूँ।

**'जीवेत् शरदः शतम्। भूयश्च शरदः शतात्।।**

**- आर्य समाज, शगुन चौक,**
**म.दयानन्द पथ, पिंपरी-पुणे १७**

आद्याक्षरांजली

# श्रीमान शंकरराव मयाचारी गुरूजी, स्वीकारावा मानाचा मुजरा आमुचा!

**-सौ. सुभद्रा मारूतीराव घोरपडे**

श्रीमान शंकरराव मयाचारी गुरूजी
स्वीकारावा मानाचा मुजरा आमुचा,
मान बहुमानाने, सन्मानाने योग आला आहे
हा आपुल्या अमृत महोत्सवाचा।
नमस्कार कोटी-कोटी आपुल्या पवित्र आदर्श,
सत् चरणी अखंड आम्ही करतो,
शंभर वर्षे आयुष्य लाभो, ही मनापासूनी
ईश्वर चरणी अखंड प्रार्थना करतो।
कर्तव्यदक्षता, कार्यकुशलता, सभ्यता,
सौजन्यता, सहनशीलता यांनी अमृतवर्ष गाठले,
रत्नात श्रेष्ठ हे 'ज्ञानरत्न' जाणुनी ज्ञानदान,
धर्मोपदेश, हितोपदेश सतत करत राहीले।
राहणी साधी, उच्च विचारसरणी, प्रेमळ मन,
ओजस्वी मृदुभाषेने जीवन आदर्श केले,
वलये अनंत वाढवली विविध गुणांनी व
कर्तृत्वाने अन् अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बनवले।
मनुष्य विचारी असेल तर तत्त्वज्ञ, सेवाभावी,
मातृभक्त, देशभक्त बनतो असे पटविले,
या आर्य वीरांनी संगठित व्हा, दयानंदाच्या
विचाराचा स्वीकार करा, असे सांगितले।
चारित्र्य संपन्नता, उच्चारावरून विद्वता,
आवाजावरून नम्रता, वर्तनात सुशीलता हे साध्य केले,
रीत न्यारी आपुली वागण्याची, बोलण्याची,
प्रसन्न मन, प्रसन्न चेहरा नाही कुणा हे जमले।
गुरूमंत्रांनी गुरूजी आमुच्या भित्र्या मनाला
वीरांगणाच्या कथा सांगून धाडसी बनवलात,
रूढी, परंपरा, वर्णभेद, जातिभेद काढून

देशप्रेम, सत्यनिष्ठा, नीतीमूल्ये यांचे धडे दिलात।

जीवनी आलेल्या संकटांना, विकारांना
धाडसाने स्थितप्रज्ञ बनून सहज हाताळले,
स्वीकारलात गुरूकुलचे ज्ञानदान, तयार केलात
विद्यार्थी महान, 'शिवमुनी' नाव शोभले।

काया झिजवली संसाराचे, शाळेचे, गुरूकुलचे,
आर्य समाजाचे करण्या सुवर्णरूप साकार,
राहीले जपुनी केले झटूनी, दिलात आर्य समाज,
गुरूकुल व कुटुंबाला अपूर्वच आकार।

वासना कधी न स्पर्शिली प्रसिद्धीची, खुर्चीची,
परि महत्त्व दिले सतत कर्तव्याला,
मातृप्रेम; आप्तेष्ट नाते सांभाळून सुविद्य पत्नी
मंगलाबाईने आपल्याला खंबीर आधार दिला।

नातलग, नातवंडे, लेकी-सुना, मुले-जावयी,
मित्रमंडळी यांनी गोकुळ नेहमी भरलेले,
चातुर्य, साधेपणा, सद्विचार, सहानुभूती,
सदाचार यांनी घर छान सजलेले।

मुले आपुली आदर्श बनली आपुल्याच
सद्विचाराची, सत्कर्माची, नीतीमूल्यांची,
जवळी आले रंजले-गांजले सढळ हातांनी
मदत केली, वासना न कधी द्वेष-मत्सराची।

रामराज्ये होते ते 'आपुले गुरूजी व शिष्याचे नाते,'
विश्वासाचे, तळमळीचे, धडपडीचे,
आता वाटते परत कधी येतील दिवस ते,
काटेरी वाटेने नदीकाठावरून शाळेला जायाचे।

मुलांबाळांचे आपुले पुढील आयुष्य सुखाचे यशाचे,
समृद्धीचे जाओ ही प्रार्थना ईश्वराकडे,
चार शब्द हे माझे पडती तोकडे गाण्याआपुल्या
गुणांचे पोवाडे परि वाजू दे चौघडे.।

-लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर (मो. ९४०३०१२३३९)

# हमारे सुयोग्यसाथी शिवमुनिजी

**- वैद्य विज्ञानमुनि (अण्णाराव पाटील)**

निरुक्त के अनुसार पांच ब्राह्मणों से 'मय' ब्राह्मण में कुल में आचार्य शिवमुनिजी का जन्म माना जाता है । पिताजी भीमरावजी बढई का कार्य करते थे। वे सारे गांव के प्यारे थे। जमीन ४० एक्कर थी, अब भी है। सौ. राधाबाई भीमराव मयाचारी के इकलौते सुपुत्र शंकरराव मयाचारी व एक बहन कमलाबाई। बाल्यावस्था में ही माता का देहान्त हो गया, तो पहली माता सरस्वतीबाई ने अच्छी तरह से लालन पालन किया। आचार्यजी की शिक्षा श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी व हैदराबाद में हुयी। विद्यार्थी अवस्था में ही सामाजिक कार्य करने की लगन थी। 'आर्य कुमार सभा' स्थापित कर उसका सारा वृत्तान्त सार्वदेशिक सभा को भेजते थे। आर्य समाज औराद के काफी समय तक 'मन्त्री' पद को सम्भाला है। विद्याध्ययन के बाद श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी में अध्यापन का कार्य किया।

सन् १९९६ में वानप्रस्थ दीक्षा ग्रहण करके 'शिवमुनि' नाम स्वीकार किया और तबसे आपे स्वामी श्रद्धानन्द गुरूकुल का सारा कार्यभार संभाला। गुरूकुल में रहते हुए महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के सात साल तक मन्त्री बनें रहे और सभा को सुचारू रूप से चलाया। सभा की सारी गतिविधियाँ पूर्ण रूपेण संपन्न की। आचार्यजी का तपस्वी जीवन देखकर आर्य समाज परली वैजनाथ ने उनका गौरव किया। गुरूकुल आश्रम आमसेना (उडीसा) ने भी गौरव करके सत्कार किया है। आचार्यजी युवावस्था में एक अच्छे कीर्तनकार थे। अब प्रसन्नता का विंषय है कि उनकी उपनिषद पर पुस्तक छापी जा रही है। उन्होंने अपना समग्र जीवन आर्यसमाज व गुरूकुल के लिए दिया है, वह भी कुछ वेतन न लेते हुए। यह उनकी महानता है। कुछ समय पूर्व हृदयविकार होने के कारण डॉक्टरों के कहने से अपने गांव औराद में निवास करने लगे हैं। उन के सान्निध्य में रहते हुए हमें बहुतकुछ सीखने मिला।

ऐसे हमारे गुरूकुल आश्रम के परमसाथी आचार्य शिवमुनिजी के अमृत महोत्सव पर ईश्वर उन्हें दीर्घायु प्रदान करें, यही प्रार्थना।

- प्रमुख चिकित्सक, संजीवनी आरोग्य मंदिर,
श्रद्धानन्द गुरूकुल परली-वैजनाथ
मो. ९९७५३७५७११



# पिता की छवि- अविरल धारा बहती रही

- सौ. इंदुमती गुरूनाथ पांचाळ,
बीदर (कर्नाटक)

**मैं** जन्मी महाराष्ट्र के औराद गाँव मे और मेरी यादों का सिलसिला शुरू होता है, उस गाँव में स्थित हमारे पुश्तैनी मकान से। इसके आगे की हिस्से में पिताजी का साम्राज्य था, जहाँ वे निहायत अव्यवस्थित ढंग से फैली बिखरी पुस्तकों - पत्रिकाओं और अखबारों के बीच या तो कुछ पढते रहते थे, या फिर नौकरों -चाकरों से पूरे दिन भर के काम का ब्यौरा लेकर दूसरे दिन के कार्यों की योजना बताते थे। अंदर के कमरों में हम सब भाई - बहनों के साथ रहती थी। हमारी मृदुभाषी माँ, जो सबेरे से शाम तक हम सबकी इच्छाओं और पिताजी की आज्ञाओं का पालन करने के लिए सदैव तत्पर रहती थी।

माँ में धरती से कुछ ज्यादा ही धैर्य और सहनशक्ति थी। पिताजी की हर ज्यादती को अपना प्राप्य और बच्चों की हर उचित अनुचित फरमाइश और जिद्द को अपना फर्ज समझकर बडे सहज भाव से स्वीकार करती थी वह। उन्होनें जिंदगी भर अपने लिए कुछ माँगा नहीं, चाहा नहीं ---- केवल दिया ही दिया।

पिताजी नौकरी के साथ-साथ समाजसुधार के कामों से भी जुडे हुये थे। शिक्षा के वे केवल उपदेश ही नहीं देते थे, बल्कि उन दिनों कितने ही विद्यार्थियों को अपने घर रखकर पढाया है, जिनमें से कई तो बाद में ऊँचे-ऊँचे ओहंदे पर पहुँचे। ये उनकी खुशहाली के दिन थे और उन दिनों उनकी दरियादिली के चर्चे भी कम नहीं थे। एक ओर वे बेहद कोमल और संवेदनशील व्यक्ति हैं, तो दूसरी ओर वे अनुशासन में कठोर है।

उनके क्रोध को देखकर हम सभी भाई-बहनों में उनके सामने ठहरने तक भी हिम्मत नहीं होती थी। वे कभी-कभी हम सभी भाई-बहनों व माँ पर उसी तरह बरसते थे, जैसे आषाढ के बादल! परंतु हम सबके प्रति अपार स्नेह रखते, जिसे वह प्रकट नहीं करते थे। हम सबके लिए वे दिन रात परिश्रम करते थे। हमारी सुख-सुविधा में कोई कमी न रह पाये, ऐसी उनकी हर संभव कोशीश रहती थी। और यह बात माँ जानती थी, इसलिए उनकी शिकायत वह कभी भी किसी के सामने नहीं करती थी।

वैसे पिताजी ने हमें खेलने, खाने-पीने से कभी नहीं रोका और न ही कभी लाड-प्यार में कमी रहने दी। जब भी बाहर से आते, ढेर सारे फल, मिठाई, कपडे हम सबके लिए लाते। फिर भी हम पिताजी के करीब नहीं थे। हम अपनी इच्छा, आकांक्षा का दर्पण केवल माँ के सामने ही खोल सकते थे।

पिताजी घर में न हो, तो तब घर हम सबकी चिल्लाहट से भरा रहता था, परंतु जैसे ही उनके आने की भनक लगी नहीं कि हम सब कापूर हो जाते। और पिताजी हम सबके बारे में माँ से पूछते-'कौन कहाँ गया है? कौन क्या कर रहा है?' कौन कितने बजे तक बाहर रहा? कौन कितना पढ रहा हैं? आदि बातों की जानकारी उनके पास रहती थी। कभी किसी बच्चों में कोई खामियाँ नजर आई नहीं कि उनको अकेले बात कर सही राह पर चलकर जीवन में उन्नति करने की सीख देते।

पर मैं यह सब इसलिये नहीं गा रही हूँ कि मुझे उनका गौरव गान करना है, बल्कि मैं तो यह देखना चाह रही हूँ कि उनकेव्यक्तित्त्व की कौनसी खूबी और खामियाँ मेरे व्यक्तित्त्व के ताने-बाने मे गूँथी हुई है या कि अनजाने- अनचाहे किये गये उनके व्यवहार ने मेरे भीतर किन ग्रंथियों ने जन्म दे दिया।

बचपन मे मैं बहुत जिद्दी थी। फिर भी पिताजी से अधिक जिद्दी नहीं थी। हमारे घर में लडकियों के शादियों की उम्र सीमा थी, दसवी पास। अत: दसवी पास होते ही मेरी बडी बहन की शादी हो गई और मेरी तेरह साल के आयु में ही। उनके इस फैसले ने ही क्या मेरे भीतर ऐसी गहरी कुंठा भाव की ग्रन्थि पैदा नहीं कर दी कि मान, सम्मान और प्रतिष्ठा पाने के बावजूद आज तक मैं उससे उबर नहीं पाई? होश संभालने के बाद से ही पिताजी से शादी की बात को लेकर हमेशा मेरी टक्कर ही चलती रही। इसी का परिणाम रहा कि उन्होंने मेरी दोनों छोटी बहिनों को पढने का अवसर दिया और डिग्री के बाद ही उनकी शादी करने का फैसला लिया।

पिताजी का आग्रह रहता था कि लडकियाँ सुघड ग्रहिणी और कुशल पाक शास्त्री बनें। वे औरतों की स्वतंत्रता को घर की चार दीवारी से दूर नहीं देखना चाहते थे। तो दूसरी ओर घर की चार दीवारी के बीच बैठकर देश की स्थितियों को जानने, समझने, साहित्यिक पुस्तके पढने की सलाह देते। परंतु मुझे पिताजी के विचारों के दायरे में चलना कठिन था।

उनकी छत्र-छाया के हटते ही पहली बार मुझे नए सिरे से अपने वजूद का

एहसास हुआ था। तब चार दीवारों में आसन्न स्थिति में बैठना मेरे लिए असंभव था।

पिताजी से प्राप्त जिद्दी तथा कर्मठ स्वभाव अब मेरे लिए वरदान सिद्ध हुआ। क्योंकि जिद्दीपन से ही मैंने दिन रात मेहनत कर अपनी पढाई पूरी की और उसके बाद वायुसेना विद्यालय में हिन्दी अध्यापिका पद पर सफलता पूर्वक कार्य करते हुए अपने व्यक्तिगत अनुभवों, अहसासों को लेखनी द्वारा प्रकट करना आरंभ किया। गहरी अनुभूति कभी कविता के माध्यम से, तो कभी लेख-कहानी, तो कभी भाषण के माध्यम से प्रकट हुई। इस उपलब्धी पर मैं भरोसा नहीं कर पाती, पर पिताजी मेरे कार्यो की प्रशंसा किये बगैर नहीं चुकते। मेरे काम के प्रति निष्ठा व लगन को देखकर उनका चेहरा गर्व से चमकता ही नहीं, बल्कि दूसरे के सामने मेरी उपलब्धी का जिक्र करना नहीं भूलते। पर यह सब उनकी ही छवि है, जो अविरल धारा की तरह मेरे अंदर बहती रहती है।

**काव्यकुंज -**

# शिवमुनिजी... भूषण धर्माला

**- अंबादास रामराव जाधव**

अज्ञानातून ज्ञानाचा मार्ग दाखविला
धन्य-धन्य ते शिवमुनिजी भूषण धर्माला ।।धृ।।
आदर्श शिक्षक सोज्ज्वळ जीवन
विद्यादानासाठी केले समर्पण
संस्कृत आणि राष्ट्र भाषेसाठी, वाहीले जीवनाला ।।१।।
कणखर बाणा सतत कसोटी
ध्येय निष्ठ तत्वाची सचोटी
खांद्यावरती धुरा घेतली,धर्म जागविण्याला ।।२।।
आर्य समाजी चंदन झीजले
सत्कार्याचा सुगंध दरवळे
शतायुषी हो त्यांचे जीवन प्रकाश देण्याला ।।३।।

**- मु.पो. कदेर ता.उमरगा जि.धाराशिव**

# माझे दैवत आचार्य - शिवमुनिजी

**- राम सदानंद सनातन**

**वि**शिष्ट ध्येयाचा ध्यास घेऊन त्याच्या चिंतनात मनांत राहून आपले आयुष्य समर्पित भावनेने अर्पित करून जीवन जगणाऱ्या व्यक्ती विरळ असतात, अशा विरळ व्यक्तीपैकी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे पू. शिवमुनिजी (पूर्वाश्रमीचे श्री. शंकरराव मयाचारी) हे आहेत. त्यांनी इतराच्या जीवनात सुख निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. **''संतोषं जनयेत् प्राज्ञाः तदेवेश्वरपूजनम् ।''** दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हीच ईश्वरपूजा या न्यायाने त्यांच्या जीवनाची वाटलाल चालू आहे.

श्री शंकरराव भीमराव मयाचारी यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यांतील उमरगा तालुक्यातील औराद या गावी २१ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. हे गांव त्यावेळी एक आदर्श खेडे होते. एकही हॉटेल किंवा पानटपरी नव्हती. सर्वजण निर्व्यसनी उद्योगी वैदिक धर्माचरण करणारे होते. पूज्य हरिश्चद्र गुरूजी (स्वामी श्रद्धानंदजी), पूज्य ब्रह्ममुनिजी, विज्ञान मुनिजी हे याच गावांतील आहेत. हिंदी सत्याग्रहामध्ये, गोवध बंदीच्या सत्याग्रहामध्ये येथील बऱ्याच लोकांचा सहभाग आहे. शिवमुनिजींना सुद्धा साहजिकच लहानपणापासून वैदिक धर्माची आवड निर्माण झाली.

भीमराव मयाचारी यांना एक मुलगा व एक मुलगी. घरची परिस्थिती चांगली असल्यामुळे यांचे बालपण अत्यंत लाडात गेले. शिक्षणाची आवड असल्यामुळे इंटरपर्यंतचे शिक्षण हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठात झाले. शिक्षणानंतर प्रथम उजळंब जे की सध्या कर्नाटक राज्यांत आहे. तेथे त्यांनी मुख्याध्यापक म्हणून कार्य केले. नंतर गावाच्या जवळच असलेल्या गुंजोटी येथील श्रीकृष्ण विद्यालयात १९५७ ते १९९१ पर्यंत शिक्षक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच गुंजोटी येथे संस्कृत विषय सुरू झाला. राष्ट्रभाषा हिंदी या विषयाच्या परीक्षेला सुद्धा विद्यार्थी बसवित असत. या परीक्षेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बी.ए. समकक्ष असणारी ''कोविद परीक्षा'' ही स्पर्धा केंद्रामधून होत असे. याही परीक्षेचे परीक्षा केंद्र प्रशालेत त्यांनी चालू केले होते. टिळक विद्यापीठातर्फे संस्कृत विषयाच्या परीक्षा, सामान्यज्ञानाच्या परीक्षा सुरू

करून विद्यार्थ्यांना घडविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असायचा.

शिक्षक हा विद्यार्थ्यांना घडवणारा शिल्पकार असतो या प्रमाणे त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडवले. त्या अनेकापैकीच मी एक आहे.

माझी जन्मभूमी नाईचाकूर ता. उमरगा. वडीलाचे नांव सदानंद तर आईचे नांव कमळाबाई. पीढीजात व्यवसाय सुतारकी, बारा बलुतेदारीचे काम जेमतेम. कुशल कारागिरीचे काम तर त्यावेळी फारच कमी. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. घरात उंदराना सुद्धा खायला मिळत नसल्यामुळे ते आमचे घर सोडून जात असत. आम्ही तीन भाऊ, तीन बहिणी असा आमचा एवढा मोठा परिवार. पहिले अपत्य म्हणजे मी. गावात चौथीपर्यंत शाळा. मला शिक्षणाची आवड व वडिलांना सुद्धा शिकवण्याची आवड. या गरिबीने आमची पाठ कधीच सोडली नसल्यामुळे मी तिसरीला शिकत असतांना शाळेत सतत अनुपस्थित राहत असे. शिक्षकांनी आमच्या वडिलांना बोलावून घेतले. सहज बोलण्यात कटूता निर्माण झाली आणि आमच्या वडिलांनी मला चक्क शाळा सोडण्यास सांगितली. महिनाभर जनावरे राखण्याचे काम केले. वर्गात माझा दुसरा नंबर असल्यामुळे हेडमास्तर अस्वस्थ झाले. त्यांनी आमच्या गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. माणिकराव कारभारी यांना सांगितले. माणिक कारभाऱ्यांनी वडिलांना बोलावून घेऊन समज दिली आणि मला पुन्हा शाळेत जाण्याची संधी मिळाली. चौथी बोर्डाची परीक्षा तुरोरी केंद्रातून १९५७ साली उत्तीर्ण झालो. गावात पाचवीचा वर्ग नसल्यामुळे मी रामलिंग मुदगडला इयत्ता ५ वी, ६वी पर्यंतचे शिक्षण घेतले. १९५९ मध्ये सहावी उत्तीर्ण झालो.

उन्हाळ्याची सुट्टी होती. पू. मयाचारी गुरूजी नाईचाकूरला मावसभाऊ श्री विश्वनाथराव महामुनी यांच्याकडे आले होते. त्यावेळेला आमच्यामध्ये एकाकडे जर पाहुणा आला तर सर्वांनी बोलावण्याची पद्धत असल्यामुळे माझ्या वडिलांनीही त्यांना घरी बोलावून आणले.चहापाणी, गप्पा गोष्टी झाल्या. अचानक मी तेथे उपस्थित झालो. त्यांनी चौकशी केली. ''मुलगा शिकण्यासारखा आहे.'' असे उद्गार निघाले. वडील म्हणाले,'' मुदगडला सातवीपर्यंतच शाळा आहे. मला काही त्याला पुढील शिक्षण देता येणार नाही''. ''बघू बघू'' असे मयाचारीजी म्हणाले. हे सर्व मी ऐकत होतो. माझ्या बालीश बुद्धीला यातले काय कळणार? ''नियतीच्या मनांत काय आहे'' हे आधी कोणीच सांगू शकत नाही. पू. मयाचारीजी औरादला

गेले.त्यांच्या मनांतला मानस आई वडिलांना सांगितला. माझ्या जीवनांत अनपेक्षित घटना घडली. नाते जुळले, आनंदाची बातमी पत्राद्वारे कळली. ''तुमच्या मुलाला शाळेला पाठवून द्या. सोबत शाळेचा दाखला घेऊन या.'' वडिलांनी पेटी डोक्यावर घेतली आमचा पायी प्रवास नाईचाकूर ते औराद व्हाया उमरगा सुरू झाला. प्रवासात वडिलांनी कानमंत्र सांगितला. आईचे हृदय चिंतेने व्याकुळ झाले. सर्वांचे आशीर्वाद घेऊन मी औरादला पोहोंचलो.

श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी या प्रशालेत १९५९-६० मध्ये माझा प्रवेश वर्ग ७ वी मध्ये झाला. वडिलांनी एक दिवस मुक्काम केला. घरामध्ये त्यांचे आई-वडील आणि मी. त्यावेळी सौ. मंगलकाकू त्यांच्या माहेरी खसगी या गावी गेल्या होत्या. चार-पाच महिन्यानंतर सौ मंगलकाकू, कु. वसुमतीसह आल्या. सौ. काकू कशा असतील? या विवंचनेत होतो. चेहरा हा मनाचा आरसा आसतो, असे म्हणतात. काकूला पाहता क्षणी आनंद झाला. मनाची विवंचना कमी झाली.प्रत्येक पुरूषाच्या मोठेपणांत त्यांच्या अर्धांगिनीचा वाटा असतो. याची प्रचिती आली. जर मला काकूं कडून प्रेमळ वागणूक मिळाली नसती, तर माझे काय झाले असते हे नियतीलाच माहीत. काकूंनी मला आईचा जिव्हाळा, बहिणीची माया दिली, काकूच्या आईवडिलांनी ठेवलेल्या नावाप्रमाणे सर्वांचे मंगल करणारी अशी मंगलकाकू आहे. प्रेमळ, सोज्ज्वळ, निर्मळ स्वभावाने सालस रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नाती अतूट असतात. या संबंधानी काकूनी मला आई-वडिलांची आठवणच होऊ दिली नाही.

सौ. मंगलकाकू मनमिळाऊ, परोपकारी, नित्यानंदी असल्यामुळे माझ्या अनेक चुका पदरात घेतल्या. त्यांच्या इच्छेविरूद्ध वागलोही असेन, तेही सहन केले. मला ''राम'' या प्रेमळ नावाने हाक मारीत असत. अमृतमय स्नेहाने आणि अत्यंत प्रेमाने मला वागणूक दिल्यामुळेच मी समाधानाच्या उच्च शिखरावर आहे. या उपकारातून उतराई होण्यास माझ्याजवळ काय असणार! एवढ्याचसाठी **''उगियाची माथा ठेविजे चरणी। हेचि भले''** त्यांच्यामुळेच आज हे आदर्श कुटुंब म्हणून समाजात वावरत आहे.

१९६३ मध्ये मी मॅट्रीक पास झालो. गुंजोटी येथील शिक्षण संपले. माझे सर्व मित्र उमरग्याला कॉलेजला जाऊ लागले. मलाही पू. मयाचारीजींनी उमरग्याला कॉलेजला जाण्यास सांगितले म्हणजे महाविद्यालयीन शिक्षणाचीही प्रश्न त्यांनीच

सोडविला. औराद ते उमरगा हे अंतर खूप असल्यामुळे माझ्या सर्व मित्रांनी सायकली घेतल्या होत्या. माझ्या वडिलांनीही सायकल घेण्यासाठी खूप प्रयत्न केला, पण परिस्थितीमुळे शक्य झाले नाही. माझी दररोजची औराद ते उमरगा जाण्यायेण्याची अडचण त्यांच्या लक्षात आली आणि तात्यांनीच मला न मागता स्वत: होऊन माझे वर्गमित्र श्री. बळीराम सूर्यवंशी, विश्वंभर जगताप यांच्याकडे चौकशी करायचे आणि मला खर्चाला, परीक्षा फीला पैसे द्यायचे. अशा प्रकारे १९६७ मध्ये माझे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले व बी.एस्सी.उत्तीर्ण झालो. १९६० ते १९६७ या शैक्षणिक कालावधीमध्ये संपूर्ण शिक्षणासाठी त्यांनीच खर्च केला. श्रीमंतांना धनाचा आधार असतो. काहींना नात्यागोत्याचा आधार असतो. लहान बालकांना माता-पित्याचा आधार असतो, पण हे सर्व आधार अशाश्वत आणि मोडणारे असतात. ज्ञानाचा आधार हा न मोडणारा शाश्वत आधार असतो. म्हणूनच सर्व दानांमध्ये ज्ञानदान हे श्रेष्ठ दान मानले जाते.- **''सर्वषामेव दानानां ज्ञानदानमेव विशिष्यते।''**

कारण ती जीवनाची शिदोरी असते. ती एकदा दिली की कायम घेणाऱ्यांचीच होऊन जाते आणि संबंध आयुष्य सुख देते. या ज्ञानशिदोरीवरच १९६७ ते २००६ पर्यंत शिक्षकी पेशा स्वीकारून मला सुखी जीवन जगता आले. ज्ञान शिदोरी बरोबरच संस्काराची शिदोरी दिली. त्यामुळेच माझ्या कुटुंबातील घटकांना शिकवून त्यांना स्वावलंबी करता आले. मला शिक्षकाची नोकरी लागली तरीही त्यांना माझीच काळजी एकट्याच्या पगारावर कुटुंब कसे भागवतोस?' माझ्या वडिलांबद्दल दोघांच्याही मनांत खूप आदरभाव. माझ्या वडिलांना दादा म्हणत असत. माझ्या बहिणीच्या लग्नाच्या वेळेला बैलगाडीतून धान्य, गुळ पाठवून दिले.

५ सप्टेंबर १९८७ ला माझा उस्मानाबाद जिल्हा परिषदेमार्फत आदर्श शिक्षक म्हणून गौरव केला. याचा आनंद माझ्यापेक्षा त्यांनाच जास्त झाला. सौ. काकूंनी त्यांना सांगितले की '' रामचा गौरव झाला आहे.'' तुम्ही भेटून या. लहान मुलाला शृंगार केला, तर त्याचे कौतुक त्या मुलाला नसते, तर त्याच्या आईवडिलांना असते, त्याप्रमाणेच त्यांनी माझे कौतुक केले. माझ्या काळजीपोटीच त्यांनी माझी मुलगी सौ. वर्षा हिला सून म्हणून स्वीकारले. देणे घेणे कांहीच नाही. माझी आर्थिक परिस्थिती जेमतेम असून सुद्धा माझा मुलगा चि. संतोष याचा जावई म्हणून स्वीकार केला.

त्यांच्या जीवनामध्ये एक दोन गंभीर आजार आले. १९७२-७३ ला ते पुण्याहून येताना अचानक पोट दुखीचा भयानक त्रास होऊ लागला. उमरग्याला डॉ. महाजनला दाखविले. त्यांनी त्वरित ऑपरेशन करावे लागेल, असा सल्ला दिला. उमरग्याला त्यावेळेला ऑपरेशनची सुविधा नव्हती. डॉ. पतंगे उस्मानाबादला त्यावेळेला जिल्हा शल्य चिकित्सक होते. श्री रघुराम गायकवाड गुरुजींनी उस्मानाबादला नेले. ऑपरेशन फॉर्मवर घरच्या माणसांची सही असल्याशिवाय ऑपरेशन करता येत नव्हते. अशा विकट प्रसंगी डॉ. पतंगे यांनी ऑपरेशन फॉर्मवर स्वत:ची सही करून त्वरीत ऑपरेशन केले आणि रघुराम गुरूजींना औरादला पाठवले कारण त्यांना रक्ताची गरज होती. रक्तदान करणारी माणसे औरादहून नेली.

"A Friend in need is a friend indeed" या म्हंणीप्रमाणे डॉ. पतंगे, गायकवाड गुरूजी, यांनी सहकार्य केल्यामुळेच हा अमृतमहोत्सव साजरा होतो आहे. असे म्हंटल्यास काही वावगे होणार नाही.

पुन्हा नंतर हृदय विकाराचा आजार सोलापूरच्या अश्विनी हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले डॉक्टरांनी बायवास सर्जरीचा सल्ला दिला. पण त्यांनी तो नाकारला. डॉ. संजय गायकवाडकडे चिलेशन थेरपीचा उपचार सुरू झाला. काटेकोरपणे पथ्य पाळून योगासनाचा अभ्यास सुरू ठेवून प्रचंड आत्मविश्वासाने या रोगावर विजय मिळवला.

१९९१ ला ते सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीचा काळ जनतेला उपयुक्त कसा होईल? याचा ध्यास त्यामुळेच १९९१ ते १९९५ या कालावधीत छत्रपती शिवाजी कॉलेज उमरगा येथे संस्कृत विषय शिकवण्याचे कार्य त्यांनी केले. वैदिक धर्माची विचारसरणी असल्यामुळे यामध्येही ते समाधानी राहू शकले नाहीत. वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा त्यांचा दृढनिश्चय. यासाठी डॉ. सु.ब.काळे (ब्रह्ममुनिजी) यांची प्रेरणा त्यामुळे त्यांनी दि. २० मार्च १९९६ ला परळी येथे वानप्रस्थाश्रम स्वीकारून तेथील गुरूकुलाचे आचार्यपद सांभाळले.

सेवानिवृत्तीनंतर २० वर्षांनी 'उपनिषदांचे सार' हे पुस्तक लिहून त्यांचे प्रकाशन या अमृत महोत्सवी वर्षात होत आहे. संस्कृत भाषेची दुर्बोधता नाहीशी करून, वेद, उपनिषदे यांचा अभ्यास त्यांनी यथाशक्ती केला. त्या अभ्यासाचे फल त्यांना जे मिळाले, त्या फलांतील काही अंश वाचकांच्या सेवेला अर्पण करता यावा

म्हणून हा ग्रंथ फळाला आला. अमृतमहोत्सव साजरा होताना आज त्यांचे जीवन तृप्तीने भरले आहे. वडिलांनी कमावलेल्या संपत्तीचे सर्वच वारसदार असतात. पण आजच्या कलियुगात सद्गुणांचे वारसदार कोणी व्हायला तयार नाहीत. पण यांच्या कुटुंबाने सद्गुणांचा वारसासुद्धा जतन केला आहे. आज श्रीधर, विक्रम, विकास ही तीन मुले संस्कृत विषयाचे शिक्षक म्हणून कार्य करीत आहेत. दिलीप सोलापूरला पोलीस खात्यामध्ये, अरूण चिपळूणला केमिकल कारखान्यात, अजित उस्मानाबाद सहकारी बँकेमध्ये सर्व सहा मुले सक्षम असून कर्तबगार आहेत. सौ. वसुमती अंगणवाडी शिक्षिका, सौ. इंदुमती बीदरला इंग्लीश स्कूलला शिक्षिका, सौ. मधूमती उदगीरला संस्कृत शिक्षिका, सौ. रूपमती नाईचाकुरला शिक्षिका अशा चारही मुली शिक्षणक्षत्रात कार्यरत आहेत. सर्व सुनामध्ये परस्पर सामंजस्याची भावना विद्यमान आहे. सर्व मुले देखील आजही आज्ञाधारक आहेत. त्यामुळे हे कुटुंब समाजामध्ये एक आदर्श कुटुंब म्हणून वावरत आहे.,

अमृत महोत्सवी वर्षात त्यांचे जीवन अमृतमय होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**- मु.पो. नाईचाकूर ता.उमरगा**
**जि. धाराशिव (उस्मानाबाद)**



## क्षमाशीलता

**क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति।**
**अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति ।।**

**अर्थ** - ज्याच्या हाती क्षमारूपी शस्त्र आहे, त्याला दुर्जन काय करणार? गवत नसलेल्या ठिकाणी (खडकाळ जागी) अग्नी पडला तर तो आपोआपच विझून जातो.

काव्यसुधा

# देवतातुल्य गुरू

- सौ. सुमन व्यंकटराव पवार

जीवन शाळेत या, मार्ग ज्यांनी दाविला,
असो काटे की फुले ही, सत्यमार्ग शोधला ।। धृ ।।

देवतुल्य गुरूचा जन्म झाला १९३३ सालात
माता-पित्यांचे छत्र हरवे लहानग्या वयांत
सोन-पाऊली मंगल भार्या वसंत फुलविला ।।१।।

जीवन पटलावरी संधी येते एकदा
पवित्र कार्य करण्याची आवड मनी असता
विद्यादान करण्या घडे यशस्विता गुरूला ।।२।।

नियतीने वक्रदृष्टी जरी फिरविली
अधु पाय होऊनी परि जिद्द नाही सोडली
कष्टाला तोड नसे सफल जीवनाला ।।३।।

दशरत्ने जाहली घरी गोकुळ साजरे
कल्याण झाले रामाचे गुरूच्या सहारे
प्रार्थना ईश्वरचरणी आरोग्य लाभो गुरूला ।।४।।

संस्कृत विषय हा जरी आवडीला
पारंगत हिंदीतही इतिहास निवडीला
हंसत हंसत तास कधी न कळे संपला ।।५।।

आवड निवड शिष्याला ना कधीही केली
सगुण गुण जाणुनी सेवा ही घडविली
वंदू आम्ही चरणस्पर्श पिता-सम गुरूला ।।६।।

त्याग गृहस्थाश्रमाचा वानप्रस्थ शिवमुनी
गुरूकुल प्रधान शोभे पद ज्ञानदायिनी
आचरणातूनी समाज सक्षम बनविला ।।७।।

सुखाच्या या संसारी सरू-सावली आधार
लहान थोरांची माया हाच जीवनाचा सार
आयुष्य सांज संध्येला आनंद क्षण हा आला

- मु.पो. नाईचाकूर. ता.उमरगा जि. उस्मानाबाद

# आदर्श व्यक्तित्त्व - आचार्य शिवमुनिजी

**- डॉ. ब्रह्ममुनि वानप्रस्थ**

**आ**चार्य पू.श्री शिवमुनिजी का मुझे बचपन से ही सान्निध्य मिला। हम एक साथ ही रहते थे। उत्तमराव सूर्यवंशी, शंकरराव पवार, वसंतराव गायकवाड, रघुराम गायकवाड आदि हम सब सहयोगी मित्र थे। इन सभी में मैं छोटा था, फिर भी वे मुझे शुभाशीष देते रहे।

आचार्य शिवमुनिजी का परिवार सात्विक एवं शुद्ध विचारों का है। आपकी धर्मपत्नी सौ. मंगलादेवी आदर्श गृहिणी, शांत, धीर एवं सुविचारोंवाली है। आपको इनका बहुत बडा योगदान मिला, जिसके कारण आप अध्यापन के साथ ही सामाजिक कार्य करने में सक्षम हो गये। पू.हरिश्चंद्र गुरूजी के सान्निध्य से आपने आर्य विचारों को ग्रहण किया। इन्हीं की संगति के कारण मै बुरी बातों से बचता रहा। पूज्य हरिश्चन्द्र गुरूजी हम सब बालकों को प्रतिदिन नदी के किनारे ले जाते थे। वहां रेती पर आसन, प्राणायाम, व्यायाम, ध्यान सिखाते और वैदिक सिद्धान्तों की भी चर्चा करते। साथ ही गांव में संध्या, हवन, भाषण प्रतियोगिता आदि कार्यक्रम भी रखते थे। गुरूजी के मार्गदर्शन द्वारा हम बच्चों में मानवीय संस्कारों बीज बोये गये। इन छात्रों में श्री शंकरराव भीमराव मयाचारी भी एक थे। कालान्तर में स्कूल व इन्टर की परीक्षा के पश्चात् वे आदर्श अध्यापक, ग्रामसुधारक व वैदिक धर्म के सच्चे प्रचारक बनें। एक पैर से अपाहिज होने पर भी उनके कार्योत्साह में कभी कमी नहीं आयी। अनेकों कष्ट सहते हुए भी उन्होंने सत्यपथ नहीं छोडा। कुशल अध्यापन के साथ ही ग्रामपंचायत, सोसायटी, आर्यसमाज व नागरिकों को यथायोग्य दिशा देने व मार्गदर्शन करने में वे सतत अग्रणी रहें। उनका गृहस्थाश्रम भी सफल रहा है। सारी जिम्मेदारियाँ उन्होंने अच्छी तरह से निभायी हैं।

मुनिजीने जीवन में सदैव मर्यादाओं व नियमों का पालन किया। हर हमेशा प्रत्येक कार्य में दूरदृष्टि रखना, दूसरों की सहाय्यता करना और ईमानदारी से अपने कर्तव्यों को निभाना, ये आपकी विशेषताएँ हैं। आर्य समाज तथा अपनें गांव में मान एवं प्रतिष्ठा प्राप्त करनेवाले आचार्य शिवमुनिजी बाहर भी प्रतिष्ठित रहें है। शुद्ध आचार-विचार एवं अर्थशुचिता के कारण उन्हें सर्वत्र मान-सम्मान प्राप्त होता रहा है। प्रान्तीय सभा के वे वेदप्रचार अधिष्ठाता, उपमन्त्री, मंत्री आदि पदों को आपने उत्तम प्रकार से संभाला है।

यदि आप वानप्रस्थी न बनते व समय न देते, तो आज परली में स्वामी श्रद्धानन्द गुरूकुल स्थापित नही होता। दो पुत्रों एवं एक कन्या के विवाह शेष रहते हुए और घर की जिम्मेदारियाँ बहुत सारी होते हुए भी आप परली गुरूकुल के आचार्य पद को संभाला और वह भी नि:स्वार्थ भाव से व संस्था से कुछ भी न लेते हुए, यह उनकी महत्त्वपूर्ण विशेषता रही है। ऐसे नि:स्वार्थी आचार्य गुरूकुल को मिले, यह परलीवासियों के लिए गौरव का विषय है।

जीवन की ढलती आयु में आज भी आचार्यजी उत्साह के साथ प्रभुचिंतन, स्वाध्याय, ग्रंथ लेखन, पथप्रदर्शन आदि कार्यों रूपमें संलग्न हैं। अमृत महोत्सव के उपलक्ष्य में आचार्यजी का जीवन अध्यात्ममय, शारीरिक व मानसिक दृष्टि से निरामय बनें और परमात्मा उन्हें पूर्ण आयु प्रदान करें, यही कामना!

**- आर्य समाज, परली-वैजनाथ**
**जि.बीड,**
**मो.९४२१९५१९०४**



# उपनिषद का अमर सन्देश

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत।
क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत् कवयो वदन्ति ।।
(कठोपनिषद-३/१४)

**अर्थ** - अपने चरम लक्ष्य मोक्ष को प्राप्त करने के लिए हे मनुष्यों! उठो, जागो और अपने से श्रेष्ठ (विद्वान् व योगी) पुरूषों के पास जाकर ब्रह्मज्ञान को सीखो। यह ब्रह्म-ज्ञान का मार्ग तेज उस्तरे की धार के समान अत्यन्त दुर्गम है, ऐसा परमात्मा के साक्षात्कार करनेवाले उपदेश करते हैं।

# शिवमुनिजींच्या सहवासात

**- धर्ममुनि वानप्रस्थ (मगदाळे गुरूजी)**

**आ**चार्य शिवमुनिजींची माझा पहिला परिचय (पूर्वाश्रमी शंकरराव मयाचारी असतांना) माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा बोर्ड, औरंगाबादच्या संदर्भात 'हिन्दी विषयाचे' ते नियामक व मी परीक्षक या नात्याने औराद (गुंजोटी) येथे झाला. तेथेच त्यांच्या सहृदयी वागणुकीची पावती मिळाली व मी प्रसन्नवदनाने घरी पोहोचलो. तसेच पुढे परीक्षा मंडळात **'प्राश्निक'** म्हणून आम्हा दोघांची गाठभेट झाली. त्यांचे 'संध्या यज्ञ-प्रकाश' हे मराठी भाषांतराचे एक पुस्तक माझ्या हाती लागले, तेव्हापासून त्यांच्या विद्वत्तेची छाप माझ्या मनावर होती. वेळोवेळी त्यांची व्याख्याने, सैद्धान्तिक चर्चा, मंत्रांच्या व्याख्या, बोधप्रद उपदेश ऐकण्याचा योग आला. त्यांचा उपदेश सरळ, सरस व प्रेरणाप्रद असतो.

सन् १९९६ साली गुरूकुलच्या संस्थापक मंडळास आचार्यजी मिळाले नसते, तर त्यांचे ते संकल्प पूर्ण झाले नसते. या गुरूकुलाचे आचार्य पद त्यांनी अत्यंत निष्ठेने सांभाळले. त्यांचा विद्यार्थ्यांशी असलेला वात्सल्यभाव, पुत्रवत् वागणूक, कार्यदक्षता, तत्परता, निर्मोही व्यवहार, सतत कार्यरत कारभारात सहयोग देणाऱ्या विविध स्वभावांच्या व्यक्तींना सांभाळणे, प्रसंगी मानापमानाचा विचार न करता संस्थेचा व आर्य समाजाचा चरमोत्कर्ष पाहण्याचा ध्यास घेतलेले आचार्य शिवमुनिजी, खरोखरच 'आचार्य' वाटतात.

कांही वर्षांपूर्वी गुरूकुल आमसेना, ओरिसा व परळी गुरूकुलात त्यांचे सत्कार कार्यक्रम पार पडले. या सत्कारात मिळालेली गौरव राशी त्यांनी वैदिक धर्मप्रचारासाठी त्या त्या संस्थांकडे सुपूर्द केली. खरोखरच त्यांची ही त्यागवृत्ती महान आहे.

अशा त्यागी, उदारमना मुनींचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. यानिमित्त आचार्यजींचे त्रिवार अभिनंदन! त्यांच्या चिरायुष्याची ईश्वराकडे प्रार्थना.

**- उदय नगर शेजारी, नांदेड नाका,**
**उदगीर, जि.लातूर**

# शिवमुनिजी-एक व्रतस्थ जीवन

**- मानवमित्र (गणेशदेव) आर्य**

'**आदर्श**' या शब्दाची व्यापकता विशालता, उदारता, भव्यता आणि दिव्यता ज्यांनी अनुभवली असेल, त्यांच्या हेही अनुभवास येईल की 'आदर्श' शब्दाची परिपूर्णता पू. आचार्य शिवमुनिजी यांच्या जीवनात सर्व दृष्टीने अवतरलेली आहे. मानव जन्म मिळावा, तोही भारतात (आर्यावर्तात)! त्या मानव जीवनाला सर्वतोपरी सार्थक करण्याची सुवर्णसंधी मिळणे, त्या सुवर्णसंधीचे सोने करणे हे अत्यंत अपवादात्मक उदाहरण आहे. असे हे आदर्श उदाहरण म्हणजे 'आचार्य शिवमुनिजी!'

पूर्वाश्रमीचे श्री.शंकरराव भीमराव मयाचारी यांनी १९९६ मध्ये वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला. आज त्यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केले आहेत. हे त्यांचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने त्यांचे आप्तेष्ट मित्र त्यांचे अभीष्टचिंतन करून त्यांचा आशीर्वाद घेऊ पाहत आहेत.

**'दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथ कर माझे जुळती,'** या म्हणीला सार्थक करणारे असे संबंध आयुष्य जगण्याचे भाग्य आचार्य शिवमुनींना लाभले. महाराष्ट्रात 'साने गुरूजी' सर्वांनाच माहित आहेत. शिवमुनिजी हे प्रति साने गुरूजी आहेत. 'गुरूजी' या शब्दाची गरीमा, शिक्षण व विद्यार्थी या दोन्ही विषयीची आतंरिक तळमळ व आत्मीयता आचार्य शिवमुनिजींच्या जीवनात पदोपदी प्रत्ययास येते. खरे पाहता अशा व्यक्तींच्या जीवनाला शब्दात बांधणे किती अवघड असते? हे त्यांच्या जीवनाशी एकरूप झालेल्यानांच कळू शकते. आपल्या कर्तव्याविषयी सतत दक्ष, जागरूक व आपुलकी बाळगणाऱ्यांच्या जीवनाला शब्दाच्या सीमा रेषा परिपूर्णता देऊच शकत नाहीत. ते एकरूप होऊनच अनुभवावे लागेल. ती एकरूपता साधण्याच्या दिशेनेच ही माझी शब्दांची तोकडी वाटचाल आहे.

शंकरराव मयाचारी (आचार्य शिवमुनीजी) यांची जन्मदात्री आई स्व. राधाबाई ही अल्पावधीतच वारल्यामुळे त्यांची मोठी आई स्वर्गीय सरस्वती बाई यांनी त्यांचे पालन-पोषण केले. त्यांचे वडील स्व.भीमराव मयाचारी यांच्या बद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांनी असा सुपुत्र समाजाला व राष्ट्राला दिला. ज्यामुळे त्यांचे नाव तर अजरामर झालेच, अनेकाचे जीवनही उजळून निघाले.

श्री शंकरराव मयाचारी यांचा जन्म औराद ता.उमरगा. जि. धाराशीव येथे झाला. शालेय शिक्षण गुंजोटी व उमरगा येथे पूर्ण झाले. इन्टरचे शिक्षण निजाम कॉलेज हैद्राबाद येथे झाले. १९५५-५६ मध्ये नागपूर येथे होमियोपॅथीचा तीन महिन्यांचा रिफ्रेशर कोर्स पूर्ण केला. १९५६-१९५८ या साली उजळंब येथे खाजगी संस्थेत मुख्याध्यापक म्हणून काम केले १९५८ ते १९७० पर्यंत श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी येथे कार्यरत राहीले. या दरम्यानच्या काळात १९६०-१९६१ ला पुणे येथे संस्थेकडून सिनीयर हिन्दी शिक्षक सनद ही पदवी प्राप्त केली. १९६४ ला खाजगीरीत्या बी.ए.ऑनर्स ही पदवी प्राप्त केली. १९६८ मध्ये वर्गात बाकावर बसण्यावरून एका श्रीमंत मुसलमान व दुसऱ्या हिंदूच्या गरीब मुलामध्ये भांडण झाले. गावातील एका मुसलमान पुढाऱ्याने त्या गरीब हिंदू मुलास मारले, तो पट्टी बांधून शाळेत आला होता. त्याचे कारण विचारल्यावर त्याला मारल्याचे त्याने सांगितले. त्या मुसलमान पुढाऱ्यास मारण्याचा काय अधिकार? बाब शाळेतली मुख्याध्यापकाकडे तक्रार करायची व माहिती घ्यायची सोडून त्याला त्याने मारले. या बाबत त्या पुढाऱ्याला ग्रामपंचायतीमध्ये बोलावून सरपंचाकडून विचारपूस करावी, या हेतूने मुख्याध्यापकासहित सर्व अध्यापक ग्रामपंचायतीमध्ये गेले. ही बाब सरपंचाच्या कानावर घातल्यावर सरपंचांनी त्या पुढाऱ्यास बोलावून घेतले. तू अमन कमिटीचा सभासद असून असे का केलास? यावरून थोडीशी बाचाबाची झाली व प्रकरण हाताघाईवर आले. ग्रामपंचायतीच्या बाहेर गावातील बरेच नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये दंगल पेटली.

या नंतर मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्याला शाळेकडे नेले व कांहीही न करता शांतपणे घरी जाण्यास सांगितले. विद्यार्थी घराकडे गेले. या घटनेला जातीय दंगलीचे स्वरूप देऊन मुसलमानांनी कांही शिक्षक व सरपंचासहित नागरिक यांच्या विरूद्ध कोर्टात केस दाखल केली. केस चालून सहा लोकांना वगळून १६ लोकांवर ६ महिन्यांची शिक्षा झाली. त्यात आचार्य शिवमुनिजी सुद्धा होते. कोर्टात जामीनावर मुक्त होऊन केस वरच्या कोर्टात चालू करण्यात आली. कांही दिवस तारखा पडल्या व कोर्टाने सर्वांनाच निर्दोष सोडून दिले. शिक्षाच जर कायम झाली, तर तुरूंगात उपनिषदांचा स्वाध्याय करण्याचा विचार केला होता. शिक्षा तर झाली नाही, पण कामाच्या व्यापामुळे उपनिषदांचा स्वाध्याय आचार्यजी करू शकले नाहीत. गुरूकुलामध्ये आल्यानंतर आचार्यजींना उपनिषदांचा स्वाध्याय

करण्याची संधी लाभली.

'वैदिक गर्जना' मासिकात मराठीत लेखमाला चालू झाली. या लेखमालेचे पुस्तकात रूपांतर करण्याची कल्पना सुचली. त्यामुळे **'उपनिषद सार'** या पुस्तकांचे प्रकाशन होत आहे. १९७०-१९७१ या काळात लोकमान्य टिळक विद्यालय, कदेर या संस्थेच्या अध्यक्षाच्या आग्रहाखातर श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी येथे रूजू व्हावे लागले. १९९१ मध्ये सेवानिवृत्तीपर्यंत येथेच कार्यरत राहीले. या प्रदीर्घ कालखंडात श्री शंकरराव मयाचारी गुरूजींनी राष्ट्रभाषा हिंन्दी व देववाणी संस्कृत भाषेची अमूल्य ज्ञानसंपदा विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवली. आजच्या विद्यार्थ्याचे भाषेचे ज्ञान पाहता डोळ्यांत दु:खाश्रू उभे राहतात. ह्रस्व-दीर्घाचे तर ज्ञान नाहीच. साधी वाक्यरचना ही करता येत नाही. ज्या गुरूजींनी विद्यार्थ्यांना संबंध आयुष्यभर भाषेचा आनंद देण्याची संधी दिली, त्या श्री शंकरराव गुरूजींना विद्यार्थी शतश: वंदन करीत असणारच... !

अशा ज्ञानप्रेमी विद्यार्थीप्रेमी, व्यक्तीला स्वस्थ कोण बसू देईल? छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील प्राचार्य श्री मुसांडे यांनी निरोप पाठविला की आमच्या कॉलेजमध्ये 'संस्कृत' हा नवीन विषय सुरू करावयाचा आहे. त्यांच्या विनंतीवरून १९९२ पासून १९९६ पर्यंत श्री शंकरराव मयाचारी गुरूजीनी अत्यंत निष्ठेने छत्रपती महाविद्यालय उमरगा येथे संस्कृत अध्यापन केले. गुरुजींनी या परिसरात संस्कृतचे लावलेले रोपटे वटवृक्षाच्या रूपात विस्तार पावत आहे.

श्री शंकरराव मयाचारी गुरूजींचे हे सर्वात मोठे सद्भाग्य की ज्या गावात त्यांचा जन्म झाला, त्याच औराद गावात एका महान विभूतीने जन्म घेतला, तो आत्मा म्हणजे पूज्यपाद हरिश्चंद्र गुरूजी होय. ज्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी आर्त स्वराने प्रार्थना करून आपल्या जीवनाचा उद्देश्य विचारला आणि त्यांना असा साक्षात्कार झाला की **'विद्यार्थ्यांचे जीवन घडविण्यासाठी आपला जन्म झाला आहे.'** ईश्वराची ही आज्ञा शिरोधार्य मानून श्रद्धेने ब्रह्मचारी राहून 'मानवता संस्कार शिबिरा'चे आयोजन करून असंख्य युवकांना वैदिक धर्माची, सत्याची, समाजाची, राष्ट्राची जाणिव करून देत राहीले व त्यांच्या जीवनाच्या उभारणीमध्ये मोलाचे योगदान दिले. आज श्रद्धेय हरिश्चंद्र गुरूजी 'पूज्य स्वामी श्रद्धानन्द सरस्वती' या नावाने विख्यात आहेत. त्यांचे वय आज ९० वर्ष ओलाडून पुढे गेले आहे. अशा थोर तपस्वी सत्यनिष्ठ व्यक्तीचा सहवास श्री

शंकरराव मयाचारींना लाभला. गुणग्राहकता संवेदनशीतला, तार्किक क्षमता श्री शंकरराव मयाचारींकडे असल्यामुळे त्यांनी अनेक विद्वानांची प्रवचने ऐकून, स्वाध्याय करून सुसंवाद साधून 'वैदिक धर्म हाच मानव धर्म आहे, मानवजीवनाची सार्थकता याच ज्ञानमार्गाने होणार आहे,' हे निश्चित करून घेतले व आपल्या जीवनाची वाटचाल केली. त्याच मार्गाने १९५६ पासून १९९६ पर्यंत जमेल तसे, जमेल तेवढे वैदिक धर्म प्रचाराचे कार्य गुरूजी करीत राहीले. प्रवचने देण्यासाठी तळमळीने खेडोपाडी फिरत राहीले. विद्यार्थ्यांवर वैदिक धर्माचे संस्कार करीत राहीले. १९७२ मध्ये गुंजोटी येथे 'मराठवाडा आर्य महासंम्मेलन' संपन्न झाले. त्यात पं.नरेन्द्रजी, स्वामी अग्निवेश इत्यादींची उपस्थिती होती. त्या महासंमेलनाचे स्वागतमंत्री म्हणून एक जबाबदारी श्री शंकरराव मयाचारी यांनी सांभाळली होती. त्या महासंमेलनात श्री शंकरराव मयाचारी द्वारे संपादित **'संध्या यज्ञप्रकाश'** व अनुवादित 'विद्यार्थी जीवन रहस्य' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले.

शिक्षकपदावर असतांना वैदिक धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी फार कांही भरीव असे कार्य करता आले नाही, याची खंत श्री शंकरराव मयाचारी गुरूजींना होतीच ते संस्काराचे बीज किती दिवस सुप्त पडून राहणार? कुमारावस्थेतील ते बीज १९९६ मध्ये अंकुर धारण करीत वटवृक्षामध्ये रूपांतरीत झाले. घरच्या विरोधाला न जुमानता मयाचारी गुरूजींनी गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात पदार्पण केले. हा एक मोठा व्यापक प्रकारचा निर्णय होता. अनेक जन्माच्या सुकर्मांचा पुण्याईचा हा परिणाम होता.

सन१९९६ मध्ये परळी येथील आर्य समाजामध्ये बैठक झाली. स्वामी श्रद्धानन्द आर्ष गुरूकुलाची स्थापना करण्याचा निश्चय झाला. त्या गुरूकुलाचे आचार्य म्हणून शिवमुनी यांचा एकमताने स्वीकार करण्यात आला. १९९६ ते २००५ या १० वर्ष एक तप गुरूकुल विकसित करण्यासाठी केलेली अहोरात्र धडपड ही दीपवून टाकणारी आहे. **'जावे त्यांच्या वंशा, तेंव्हा कळे'** गुरूकुलाची उभारणी करणे, तिथले तपस्वी जीवन जगणे, ही अग्निदिव्याची अनवरत वाटचाल आनंदाने चालत राहीले. उद्दिष्टपूर्ण जीवन जगले. असंख्य युवकांना वैदिक धर्मात दीक्षित व संस्कारित केले, भावी भारताच्या निर्मितीचा पाया रचला.

विद्यार्थी दशेत 'आर्य कुमार सभे'च्या माध्यमातून वैदिक संस्कार बालमनावर बिंबवण्याचे कार्य आचार्यजींनी केले. शिक्षक पदावर कार्य करीत असतांना औराद

येथील आर्य समाजाचे अनेक वर्षे मंत्री व प्रधान म्हणून कार्य केले. पूज्य हरिश्चंद्र गुरूजींना मानवता संस्कार शिबिराची संकल्पना देणारे आचार्यजीच होते. ३०० विद्यार्थ्यांची शिबिरे औराद या ठिकाणी यशस्वी करण्यात आचार्यजींचा सिंहाचा वाटा होता.तर भारतातील आर्य विद्वानांची प्रवचने वेळोवेळी औरादमध्ये घडवून आणण्याचे श्रेय आचार्यजींनाच जाते !

परळी येथील स्वामी श्रद्धानन्द आर्य गुरूकुलामध्ये अडचणी खूपच होत्या. आर्य समाजाचे प्रधान श्री रामपाल लोहिया यांचे स्वयंस्फूर्त पूर्ण सहकार्य आचार्यजींना लाभले. एक साधी चिट्ठी पाठविली की श्री लोहियाजी सर्व कांही पाठवून देत असत. लोहियाजी व उग्रसेन राठौर यांच्या बद्दल आचार्यजींनी कृतज्ञता व्यक्त करतात. तसेच गुरूकुल उभे करण्यामध्ये डॉ. ब्रह्ममुनिजींचा सिंहाचा वाटा आहे. व त्यांचे मला मोलाचे सहकार्य व आपुलकी लाभली, असे ते कृतज्ञतेने म्हणतात. गुरूकुलामध्ये पू. त्यागमुनिजी, सोममुनिजी, विज्ञानमुनिजी यांचा जिव्हाळ्याचा व आत्मीयतेचा लाभ मिळाला. आचार्यजींनी मुला-मुलींना शरीर स्वास्थ्याच्या दृष्टीने सर्व कांही दिले, उत्तम संस्कार ही दिले. म्हणून सर्व मुले-मुली निर्व्यसनी, कर्तव्यदक्ष व मनमिळावू आहेत. मुली आदर्श गृहिणी आहेत.

आचार्यजींच्या धर्मपत्नी सौ. मंगलाबाई यांचा समाज व राष्ट्र शत-शत ऋणी आहे. त्या आदर्श पत्नी, आदर्श माता आदर्श गृहिणी या सर्व रूपात यशस्वी ठरल्या आहेत. त्यांची मुले-मुली ही त्यांच्या सार्थक मातृत्वाची ग्वाही देत आहेत. आचार्यजींनी आपल्या धर्मपत्नी विषयी संपूर्ण समाधान व्यक्त केले आहे. त्या एवढ्या सुजाण आहेत की त्यांना मूर्तिपूजा सोडा असे म्हणण्याची गरज कधीच भासली नाही. उलट त्याच आग्रहाने घरामध्ये वेळोवेळी यज्ञविधी संपन्न करीत असतात. वानप्रस्थ दीक्षा घेतल्यानंतरही सौ.मंगलाबाई आनंदाने गृहिणी रूपात आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडत राहिल्या.हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

खरे पाहता आचार्यजींनी समाजाला अव्याहतपणे व आनंदाने भरभरून जे दिले आहे, त्याची उतराई होणे शक्य नाही. अमृतमहोत्सवानिमित्त पू. आचार्यजींना पूर्ण दीर्घायुष्य लाभो, ही प्रार्थना!

- ९३, 'कर्मनिष्ठा' आदर्श कॉलनी,
बीदर (कर्नाटक)

# आचार्य शिवमुनिजी - एक कृतार्थ जीवन

**-प्रा.डॉ.वीरेंद्र शास्त्री**

**छा**त्रावस्था में १९८५ में औराद शहाजानी में पू.स्वामी श्रद्धानन्दजी सरस्वती का 'मानवता संस्कार शिबिर' चल रहा था। प्रतिदिन नये-नये विद्वानों के मार्गदर्शन प्राप्त होते थे। उसी क्रम में श्रद्धेय मयाचारी गुरूजी (आचार्य शिवमुनिजी) का व्याख्यान सुनने का संयोग आया। तदुपरान्त कालान्तर के बाद १९९७ में स्वामी श्रद्धानंद गुरूकुल में सान्निध्य मिला।

पूज्य आचार्यजी का जीवन अत्यन्त सरल, सीधा-साधा एवं वात्सल्यपूर्ण रहा है। गुरूकुलीय शिक्षापद्धति में सर्वतोभावेन अपने आपको समर्पित करनेवाले श्रद्धेय आचार्य शिवमुनिजी ने अनुकू ल व प्रतिकूल परिस्थितियों में भी गुरूकुल का सम्यक् संचालन करते हुए आचार्य पद के गौरव को बढाया है और गुरूकुल के मार्ग प्रशस्ति में भगीरथ प्रयत्न किया है। आज गुरूकुल का जो भी वैभव, उत्कर्ष दिखाई दे रहा है, उसके मूल में श्रद्धेय आचार्यजी की अनूठी साधना रही है।


आचार्यजी का वानप्रस्थ जीवन चिन्तन, मनन, अध्ययन-अध्यापन, लेखन और प्रवचनों में पूर्णतया समर्पित, सिद्धान्तनिष्ठ रहा। वे मितभाषी हैं। आहार पर उनका बडा नियन्त्रण रहता है। आज भी समय का बडा ध्यान रखते हैं। प्रात:काल उठकर ध्यान धारणा में गहरी रूचि लेते हैं।

बडी प्रसन्नता का विषय है कि गुरूकुल के ऐसे पिता का आर्यजनों ने अमृत महोत्सव मनाने का शुभ संकल्प लिया है।

ईश्वर से प्रार्थना हैं कि पूज्य आचार्य शिवमुनिजी दीर्घकाल तक हम सभी को अपना मार्गदर्शन देते रहें। जिससे उनके द्वारा लगाये गये छोटेसे गुरूकुल रूप पौधे के उत्कर्ष व संवर्धन में हम अल्पसा सहयोग प्रदान कर सकें।

इस उपलक्ष्य में आचार्यजी का शतश: अभिनंदन!

- पतंजलि निवास, विद्यानगर,
परली -वैजनाथ जि.बीड
चलभाष - ९७६४३३२११७



# आजोळची मायाळू सावली

**– ॲड. मारुती घोरपडे**

**औ**राद हे माझे आजोळ. बालपणीचा अधिकतर काळ आजोळीच गेला. मित्र सवंगड्यासमवेत खेळण्याबरोबरच मला तेथील कांही गुरूजनांचेही मार्गदर्शन मिळत असे. मयाचारी गुरूजी हे अशा आदर्श शिक्षकांपैकीच एक. पूज्य हरिश्चंद्र गुरूजी हे आपल्या ५-६ ज्येष्ठ प्रिय शिष्यांना गावालगतच्या नदीकाठी दररोज सायंकाळी नेत व वाळूवर बसून मार्गदर्शन करीत असेच एकदा उन्हाळी सुट्ट्या लागल्यावर मी औराद गेलो असता त्या बैठकीत बसण्याचा योग आला. त्यावेळी हरिश्चंद्र गुरूजींच्या सान्निध्यात असलेल्या सर्वश्री उत्तमराव सूर्यवंशी, विठ्ठलराव पवार, शंकरराव मयाचारी विनायकराव सूर्यवंशी गुणवंतराव पाटील, रघुरामजी गायकवाड, विनायकराव पाटील, गुणवंत मा.पाटील यांचा परिचय झाला.

उल्लेख करण्यायजोगी गोष्ट म्हणजे मयाचारी गुरूजींची नजर माझ्यावर वळली व त्यांनी माझ्याविषयी आस्थेवाईक विचारणा केली. तेव्हा त्यांनी मला त्यांच्या श्रीकृष्ण विद्यालयात प्रवेश घेण्याचा आग्रह धरला, औरादला मामाकडे राहुन ये जा करीत पण ते कांही मला शक्य झाले नाही, मात्र उन्हाळी व दिवाळी सुट्ट्यामध्ये आचेळी येऊन राहू लागलो व पू.मयाचारी गुरूजींचे मार्गदर्शन घेऊ लागलो पुढे बी.ए.प्रथम वर्षाला उमरग्याच्या शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला व पुढील तीन वर्षे (पदवी) पर्यंत औरादला ये जा करीत शिकत राहीलो. येथील गुरूजनांच्या संपर्कात राहुन माझे पदवी शिक्षण केंव्हा संपले हे कळलेच नाही. विशेषत: पू.हरिश्चंद्र गुरूजी व मयाचारी गुरूजी यांचे मला अमूल्य मार्गदर्शन लाभले.

मयाचारी गुरूजी हे एक भारदस्त व्यक्तिमत्व त्यांच्या खणखणीत आवाजातला प्रभावी उपदेश आजही माझ्या कानी घुमतोय, दररोज मी त्यांच्या घरी जात असे. त्यांचे घरी राहणाऱ्या 'राम' (सनातन) या भोळ्या-भावड्या मित्राशी माझी चांगलीच गट्टी जमली. यामुळे मला गुरूजींचे घर आपलेच वाटू लागले. त्यांच्या बहुमूल्य उपदेशामुळे माझ्या जीवनाची दिशाच बदलून गेली. त्यांच्या सल्ल्यानच मी बी.ए. ला हिंदी हा ऐच्छिक विषय निवडला होता. ज्यामुळे मला भविष्यात शिक्षक म्हणून नौकरीपण लवकरच मिळाली. वाढत्या वयात आणि शिक्षक झाल्यानंतर गुरूजींनी मला आपला मित्र बनविले, हे कधी समाजलेच

नाही. पुढे १९७२ साली मोठा दुष्काळ पडला. तुटपुंज्या पगारीवर भागत नसल्याने मी आण्णाराव पाटील यांनी मिळून धान्याचा व्यापार सुरू केला. मयाचारी गुरूजीही कांही काळ यात सहभागी झाले. यात त्यांनी आमच्च्यावर फारच मोठा विश्वास टाकला होता. गुरूजीं म्हणजे अनेक सद गुणांचे भांडार. त्यांच्यातील शांतप्रिय स्वभाव व समजदारवृत्ती इतरांमध्ये क्वचितच सापडेल. माझ्यासाठी तर गुरूजीही आजोळ कडची मायेची सावली ठरली. याच सावलीत बसून आजही सेवानिवृत्तीचा कालावधी घालवावासा वाटतो.

पूज्य गुरूजींना त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षात आरोग्यधन संपदा लाभो व दीर्घायुषी बनून आम्हाला मार्गदर्शन करीत राहोत, हीच आशा

**- लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर**

# सद्गुणांचे आगर - आचार्य शिवमुनिजी

**- प्रा. शिवाजीराव गायकवाड**
**(प्रधान, आर्य समाज औराद)**

जीवनाच्या महासागरातून पोहुन जाताना वंचित दुर्बलांना, जो पोहणे शिकंवितो, विद्याथ्र्यांमधील अज्ञानाचा अंधकार दूर सारण्यासाठी ज्यांची वाणी कामाला येते, अन् अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्यासाठी हात सरसावतात, अशा सत्पुरूषांतील एक व्यक्तिमत्त्व म्हणजे **'आचार्य शिवमुनिजी'** होय. ज्ञानदानाबरोबरच यज्ञादी मार्गाने विद्याथ्र्यांमध्ये वैदिक धर्माच्या नियमांचे व आर्य समाजाच्या विचारसरणीचे धडे देत. मी पण त्यातीलच एक विद्यार्थी आहे.

माझे वडील आर्य समाजाचे कट्टर विरोधक होते. गावात व्याख्यान वगैरे असेल तर त्याची जबाबदारी आमच्यावर येत असे. हे काम मी करू नये, असा अट्टाहास आमच्या वडिलांचा होता. पण त्यांना न जुमानता आम्ही ते काम करीत असू. कारण आमच्या गुरूजींना एकच ध्यास होता की, विरोधकांच्या मुलांना

चांगल्या मार्गाने घेऊन जाणे, त्यांना सत्यज्ञानाचे धडे देणे आणि सुसंस्कृत बनविणे. हेच त्यांचे स्वप्न होते. ते त्यात यशस्वीदेखील ठरले, असे म्हणावयास काहीच हरकत नाही. कारण कालपरत्वे आमच्यातील सुधारणा पाहून वडिलांना आनंद झाला व त्यांचा विरोध पुढे कमी होत गेला.

मयाचारी गुरूजींच्या कृपाशीर्वादामुळे आज माझे कुटूंब सामाजिक कार्यात पुढे आहे. आम्ही दोघेही (पति-पत्नी) गुरूजींचे विद्यार्थी आहोत. आम्ही आज पर्यंत निर्व्यसनी बनून निराकार एक ईश्वर व वेदांच्या तत्वांना मानीत सुखाने जगत आहोत. पूज्य हरिश्चंद्र गुरूजी यांच्या 'मानवता संस्कार शिबिरां' मागची संकल्पना गुरूजींचीच होती. अशा प्रकारच्या शिबिरातून आम्ही त्यांच्याकडून प्रेरणा घेतली. स्वामी श्रद्धानंदजींच्या सहवासात राहून सर्व सामाजिक कार्यात शिवमुनिजी अग्रेसर असत. गावातील तरूण व शाळकरी मुलांना एकत्रित करून ते त्यांना निर्व्यसनी, चरित्रवान, धार्मिक बनवीत. त्याबरोबरच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे संस्कार देऊन त्यांना घडविण्याची हातोटी गुरूजींना चांगल्याप्रकारे अवगत होती.

आई-वडिलांचे एकुलते एक व संसाराच मोठा गाडा, पण कधीही न डगमगता प्रत्येक प्रसंगाला ते धैर्याने सामोरे गेले आणि त्यांना त्यात यशही मिळत गेले. पायाने अपंग असून ही त्यांनी त्याची कधीही खंत बाळगली नाही.विजयादशमीला मिरवणूक निघायची. त्यामध्ये देशभक्तीपर गीत म्हणण्यात शिवमुनिजी अग्रेसर असायचे. त्यामुळे त्यांच्याकडे पाहून आम्हालाही हुरूप येत असे.

**'विद्या विनयेन शोभते।'**या सूक्तीप्रमाणे विनम्र जीवन असलेल्या मुनिजींना मराठी, हिंदी व संस्कृत या तीन भाषा अवगत होत्या. त्यांच्यात नम्रता, शालीनता, सौजन्यता, शीलता ठासून भरलेली आहे. त्यांना मी कधीही रागावलेले पाहीले नाही.

त्यांच्या अमृत महोत्सवी समारंभानिमित्त ईश्वराकडे त्यांच्या सुस्वास्थ्य व दीर्घायुष्याची कामना!

**- कृषी नगर, बांधकाम भवनाजवळ,**
**जुना औसा रोड, लातूर**

# आमचे शिल्पकार

**– श्री माणिक सिद्राम घाटे**

**पू**ज्य आचार्य शिवमुनिजी (पूर्वाश्रमीचे शंकरराव मयाचारी) यांचा जन्म औराद ता.उमरगा येथे झाला आहे. हे गाव 'आर्य समाजी' म्हणून ओळखले जाते. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणारे पूज्य स्वामी श्रद्धानन्द सरस्वती (हरिश्चंद्र गुरूजी) याच गावचे आणि मीही याच गावातील रहिवाशी आहे. आचार्यजींचे आई-वडील फारच मायाळू व शांत स्वभावाचे होते. कसलाच गर्व नाही. आपले काम भले की आपण भला, असे ते होते. त्यांचे अध्यापन अतिराय प्रभावशाली होते.

संस्कृतचे विद्यार्थी संस्कृत विषयात ९५ ते ९६ गुणांच्या खाली येत नसत. त्यांची ६ मुले व ४ मुली सुशिक्षित असून सेवेत आहेत, हे त्यांचे भाग्यच म्हणावे लागेल. ते अतिशय शिस्तप्रिय शिक्षक होते. शाळेला वेळेवर जावे, उशीर करू नये, हा त्यांचा दंडक होता. औराद-गुंजोटीचे अंतर ३ कि.मी.पायी चालत जात येत असत. टोल पडला व पहिले शिक्षक वर्गाबाहेर पडले की ते वर्गात प्रवेश करीत असत. शिवमुनिजींची आमच्या गावांत सुद्धा अनेक वेळेला प्रवचने झाली आहेत. जि.प.च्या प्राथमिक शाळेत १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला प्रमुख वक्ते म्हणून तेच असतात. मुलांना अतिशय चांगले मार्गदर्शन त्यांच्या भाषणातून होत असे. शिक्षक असतांना आर्य समाजाचे कार्य होते. आर्य समाजी विचारसरणी मुळे ते वानप्रस्थी बनले. वानप्रस्थ घेतल्यावर परळी येथील गुरूकुलातील विद्यार्थ्यांना संस्कृतचे ज्ञान देत राहीले. परळी येथील गुरूकुलाचे प्रधानाचार्य म्हणून गुरूकुला गौरव वाढविला. अगदी परवापर्यंत महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे मंत्री म्हणून कार्यरत होते. सध्या त्यांची प्रकृती साथ देत नसल्यामुळे औराद गावीच ते राहतात. गुरूकुलची सेवा घडत नाही, याबद्दल त्यांना खंत वाटते. मी त्यांचाच विद्यार्थी! त्यांच्याकडून मला शालेय ज्ञान तर मिळालेच मिळाले, पण त्याबरोबरच आचार-विचारांचे शिक्षण सुद्धा मिळाले. त्यांच्यामुळे मी घडलो. यांचा मला अभिमान वाटतो.

अमृत महोत्सवी वर्षात परमेश्वर कृपेने त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घ जीवन लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!

# आमचे आवडते गुरूजी

– राजेंद्र पाटील
(मन्त्री, आर्य समाज, औराद)

**मी** औरादच्या जिल्हा परिषद शाळेतून सातवी पास होऊन गुंजोटीच्या श्रीकृष्ण महाविद्यालयांत प्रवेश घेतला माझ्या वडिलांच्या इच्छेनुसार मी संस्कृत हा विषय ऐच्छिक घेतला आमच्याच गावचे शंकरराव मयाचारी गुरूजी हे संस्कृत व हिंदी या विषयाचे शिक्षक होते. त्यामुळे मला आनंद झाला. त्यांची शिकवण्याची पद्धत फारच चांगली होती. आम्हाला त्यांनी शिकवलेले खूपच लवकर समजायचे. मी दहावी वर्गात असताना एकदा अपघातामुळे माझा पाय मोडला. पायास प्लास्टर झाल्यामुळे रोज गुंजोटी शाळेला जाणे शक्य झांले नाही. म्हणून मी माझे आजोळ कदेर येथील शाळेत प्रवेश घेतला. माझे सद्‌भाग्य हेच की गुरूजी येथील शाळेत मुख्याध्यापक म्हणून आले व मला त्यांचे मार्गदर्शन मिळत राहिले.

आचार्यजीच्या घराशी आमचे पूर्वीपासूनचे नाते आहे. आज ही त्यांनी दिलेला उपदेश आम्हाला आठवतो. म्हणूनच आमच्या ह्रदयात त्यांच्याविषयी खूप मोठा आदरभाव आहे. त्यांनी दिलेले प्रेमळ शब्दातील मार्गदर्शन आमच्या जीवनाला नवीन दिशा देणारे आहे.

सुरवातीला आर्य समाजाचे बांधकाम करताना मयाचारी गुरूजींनी खूपच कष्ट केले. बांधकामाकडे जातीने लक्ष दिले. गवंडी व मजुरांच्या जेवणांची व्यवस्था देखील आपणहुनच केली. गुरूपत्नी माता सौ.मंगलादेवी या सुद्‌धा खुपच प्रेमळ स्वभावाच्या! गुरूजींच्या प्रत्येक सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले. गुरूजींनी आर्य समाज औरादचे मंत्री, प्रधान, मार्गदर्शक म्हणून केलेल्या कार्याला मोठे स्थान आहे. पंधरा वर्षाखाली परळीतील गुरूकुलाचे आचार्य बनून संस्कृत, वेद व संस्कृती संवर्धनाचे त्यांनी कार्य केले. प्रांतीय आर्य प्रतिनिधी सभेचे वेदप्रचार अधिष्ठाता, मन्त्री म्हणूनही त्यांनी केलेल्या बहुमूल्य कार्याला विसरता येणार नाही. या त्यांच्या योगदानामुळे आमच्या गावची शान वाढली आहे. आर्य समाज औरादसाठी आचार्य शिवमुनिजी हे खऱ्या अर्थाने भूषण ठरले आहेत.

गुरूजींच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे अभीष्ट चिंतन! परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य देवो, हीच प्रार्थना.

– मु.पो. औराद, ता.उमरगा

# प्रेरणादायी दीपस्तंभ-आमचे अण्णा

- सौ. मधुमती नरेंद्र शिंदे

**धा**राशीव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यापासून कांही अंतरावर आडवळणी असलेले औराद हे माझे माहेर. कांही महापुरूषांच्या जन्मामुळे या छोट्याशा गावाने संबंध महाराष्ट्राला धार्मिक व आध्यात्मिक नेतृत्व दिले. अशा गावातील मयाचारी या एका आदर्श कुटुंबात माझा जन्म झाला, यास्तव मी स्वत:ला मनोमन धन्य मानते.

आमच्या आजोबांना पहिल्या पत्नीला संतती झाली नाही. म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला होता. ज्या मातेने अण्णांना जन्म दिला, तिच्या नशिबी अण्णांचा पुरूषार्थ पाहणे, लिहीले नव्हते. ती बिचारी लवकर देवाघरी निघून गेली. सावत्रआईने पालन-पोषण केले. त्या मातेने 'सावत्र' म्हणून कधीही दुजाभाव न करता जन्मदात्या मातेपेक्षा अधिक प्रेम दिले. असे म्हणतात की ज्या माणसाला आई-वडिलांचे अमाप प्रेम भेटले, तो देखील इतरांवर अमाप प्रेम करतो. त्याप्रमाणे अण्णांचा स्वभाव प्रेमळ व कनवाळू असल्याने उदार असणे साहजिकच आहे. कारण म्हटलेच आहे-**'यथा बीजं तथा फलम्।'**

घरची परिस्थिती बऱ्या पैकी होती. धन-धान्याची कमतरता नव्हती. म्हणून आई-वडिलांनी अण्णांना शिकण्याचा फारसा आग्रह धरला नाही. उलट एकटा मुलगा असल्यामुळे व छोट्या अपघाताने अपंगत्व आल्यामुळे त्यांना नजरे समोरून दूर जाऊ देत नसत. परंतू अण्णांची जिद्द फारच मोठी. अण्णांना एकटेपणाची नेहमी जाणिव व्हायची म्हणून की काय आज आम्ही दहा भावंडे आहोत. अण्णांची शिस्त, घर व गावामध्ये तसेच शाळेमध्ये पाहायला मिळायची. अण्णांच्या पावलांचा आवाज म्हणजे आम्हां भावंडाच्या गोंधळाला आवरण्याची सूचना असायची. ते बैठकीत बसल्यावर सर्वांच्या अभ्यासाची चौकशी करायचे, तेव्हा कचेरी भरल्यासारखे वाटायचे आणि न्यायाधीश झालेले अण्णा सर्वांना निर्णय द्यायचे, ते चित्र अजूनही डोळ्यासमोर उभे राहते.

समाजात वावरत असताना अण्णांचे नैतिक बळ सर्वांना प्रभावित करायचे. त्यांच्या समोरून कोणी विडी किंवा दारू पिऊन गेलेला कधी दिसला नाही. गावातील प्रत्येक हितकारी निर्णय अण्णांच्या सल्ल्याने घेतला जाई. लग्न, बारसे,

वाढदिवस इत्यादी प्रसंगी सर्व गावकरी अण्णांच्या हातून यज्ञ करायचे. त्यांच्या विना गावातील कोणतेही संस्कार, प्रश्नांची उकल व पारिवारिक, सामाजिक कार्य इत्यादी होत नव्हते. यज्ञात मिळालेली दक्षिणा अण्णांनी कधीही घरी आणली नाही. लगेच आर्य समाजाची पावती फाडायचे आणि दक्षिणेचा पैसा समाजात जमा करायचे. अजूनही तीच भावना पाहायला मिळते. या बरोबरच गेल्या १५ वर्षापासून ते परळी परिसरात अवैतनिक सेवा देत आहेत.

अण्णांचे शाळेतील अनुशासन अतिशय कठोर होते. तरी पण विद्यार्थ्यांना अतिशय प्रेमाने समजावून सांगायचे. मराठीतील व्याकरणात निपुणता असल्यामुळे बोर्डावर सूचना लिहिण्यापूर्वी सर्व शिक्षक **''ती सूचना मयाचारी गुरूजींना दाखवा,''** असे म्हणायचे. शिक्षक पदावर राहून त्यांनी आर्य समाजाच्या प्रचारासाठी नेहमी वेळ मिळेल, तेव्हा अनेक कार्यक्रम घेतले. अनेक कार्यक्रमांतून व्याख्याने दिली, तसेच ते भजन गाण्यात देखील निपुण आहेत. पूर्वी कीर्तन करण्याची आवड होती. पेटी वाजविण्यात त्यांना विशेष आनंद वाटायचा. पहाडी आवाजामुळे व बाणेदार भाषेमुळे आर्य सिद्धांताचा प्रचार केला आणि आता तर पूर्ण वेळ त्यातच असल्यामुळे वाणी बरोबर त्यांचे जीवनही बोलू लागले आहे.

समाजकार्यात इतके मग्न असलेल्या आमच्या अण्णांचे कुटुंबावरही अत्यंत प्रेम आहे. फोनवर बोलतांना प्रेमाने ओथंबलेला व भरून आलेला आवाज त्यांचा हळूवारपणा सांगून जातो. अण्णा मुलांवर कधीही रागावले नाहीत किंवा कोणाविषयी तक्रारही करीत नाहीत. सर्वांवर सारखे प्रेम करणारे एक दिवसही परिवाराला सोडून न राहणारे, वाटेत प्रवासात आढळलेला एखादा पदार्थ आठवणीने लेकरांसाठी आणणारे अण्णा अचानक वानप्रस्थी कसे झाले, हे समजलेच नाही किंवाआम्ही त्यांच्या मायेत इतके हरवून गेलो की त्यांना व त्यांच्या परोपकारी स्वभावाला ओळखू शकलो नाही.

अण्णांची ईश्वरावर अपार श्रद्धा आहे. प्रत्येक कार्य ईश्वराला साक्षी ठेऊन करा. अनीती व भ्रष्टाचारातून पैसा कमवू नका, ही प्रेरणा आम्हाला अजूनही सारखी बजावून असते. अनैतिक मार्गाने कमविलेल्या पैशातून चांगली संतती निपजत नाहीत, हे आमचे अनुभवाचे बोल आहेत, असे ते नेहमी परखडपणे सांगतात. आमच्या आईने अण्णांच्या या सर्व उदात्त भावनेला मना पासून पाठिंबा दिला. आईच्या मायेचा हात आणि अण्णांची प्रेरणा आमच्या पाठीवर असल्यामुळे

आमच्या जीवनाचे कुंदन झाले आहे. म्हणूनच असे आई-वडील लाभल्यामुळे आम्हाला धन्यता वाटते.

अण्णांनी १५ वर्षापूर्वी वानप्रस्थ घेतला. त्यांनी कपड्यांचा रंग बदलला असला, तरी पूर्वीपासूनच पांढऱ्या कपड्यात देखील एक संन्यस्त अवस्थेत होते. म्हणून अण्णाकडे पाहिल्यावर आज लक्षात येते की पांढऱ्या कपड्यातल्या अण्णांना लोक 'विठ्ठल' का म्हणायचे. खरोखरच आमच्या आजोबांनी अण्णांचे नांव 'शंकर' ठेवलं आणि जणू सर्वांचे कल्याण कर, असा राणी मदालसे सारखा उपदेश केला आणि या सुपुत्राने तो उपदेश शिरोधार्य केला आहे. सर्वांच्या कल्याणासाठी जवळपास ४० सदस्यांचे विशाल कुटूंब सोडून वानप्रस्थ आश्रम स्वीकारला. **'शिवमुनि'** म्हणजे सर्वांचे कल्याण करणारा मुनि हे नाव स्वीकारले आहे. खरेच अण्णा आमचे परम आदर्श आाहेत. अण्णांची परिवारनिष्ठा, समाज व देशनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, शिस्तपणा, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, कर्मठवृत्ती, मातृह्रदय, दयाळूवृत्ती या सर्व बाबी सर्वांना हव्याहव्याशा वाटतात.

अशा या आमच्या अण्णांना अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उत्तम स्वास्थ्य व दीर्घायुरारोग्य लाभो, ही ईश्वराजवळ प्रार्थना!

**- 'वेद सदन', सन्मित्र कॉलनी,**
**देगलूर रोड, उदगीर जि.लातूर**

## मुनिजीवन

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।**
**(कठोपनिषद-३/१४)**

**अर्थ** - सर्व प्राणिमात्रांना जी (निवृत्त होण्याची) रात्र असते, तेथे संयमी जागरूक राहतो, आणि जेथे प्राणिमात्र जागतात (प्रवृत्त होतात), ती दृष्ट्या मुनीची (निवृत्त होण्याची) रात्र असते.

# आचार्य देवो भव

**- तानाजी शास्त्री**

**पू**ज्य आचार्य शिवमुनिजी यांचा अमृत महोत्सव साजरा होतांना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या २५ वर्षापासून मी आचार्य शिवमुनींना खूपच जवळून पाहीले आहे. एका विशाल परिवाराची धुरा सांभाळत त्यांनी वैदिक सिद्धांतासाठी जे कार्य केले आहे, ते खरोखरच अजोड आहे. पूज्य स्वामी श्रद्धानंदजी व डॉ. ब्रह्ममुनिजी यांच्या सोबत राहून संपूर्ण महाराष्ट्रभर आर्य समाजाची चळवळ वृध्दिंगत करण्यासाठी आचार्यजीचे मोठे योगदान आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा, वाणीचा, वर्तनाचा प्रभाव समोरच्या व्यक्तीवर नवी छाप सोडून जातो. मानवता संस्कार शिबिरांचे आयोजन असो की , एखाद्या व्यक्तीच्या घरातील संस्कार असो, आचार्यजी तेथे उपस्थित असत व आपले योगदान देत असत. अगदी सेवानिवृत्ती नंतर त्यांनी परिवाराचा विचार न करता वैदिक आश्रम व्यवस्थेनुसार 'वानप्रस्थ' आश्रमची दीक्षा घेऊन आचार्यपदाची धुरा सांभाळली. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे महामन्त्री पद सांभाळून ही त्यांनी मोठे कार्य केले आहे.

औराद गावाची ओळख निर्माण करण्यासाठी त्यांचे योगदान खूपच मोलाचे आहे. आज संबंध महाराष्ट्रात संस्कृत शिक्षकांची भूमी म्हणून औरादची जी ओळख आहे, ती केवळ आचार्य शिवमुनींमुळेच. आज या गावातील २० पेक्षा ही जास्त संस्कृत शिक्षक या गावातील असून वैदिक विचारांनी प्रेरित झालेले नवयुवक विविध गुरूकुलांमध्ये संस्कृत व संस्कृतीचे शिक्षण घेत आहेत. याचे मूळ प्रेरणास्त्रोत पूज्य स्वामी श्रद्धानंदजी हें आहेत, असे येथे आवर्जून नमूद करावे वाटते. म्हणूनच की काय जेव्हा आर्य समाजाचे संत शिरोमणी पूज्य स्वामी सर्वानंदजी औराद येथे आले व त्यांनी येथील गुरूकुलातून शिकलेल्या घरां-घरांतील नवयुवकांची संख्या जाणून घेतली, तेव्हा त्यांनी आश्चर्यचकित होऊन या औराद गावचे 'गुरूकुल नगरी' असे नामकरणच करून टाकले.

पूज्य आचार्यजींच्या कार्याचा आलेख हा न संपणारा आहे. अनेक श्रेष्ठ बाबींनी परिपूर्ण असलेले व्यासंग त्यांच्या अंगी आहेत. ते एक 'परीस' आहेत. त्यांच्या कार्याची धुरा भविष्यात सांभाळणे, हे आम्हां नवयुवकांची जबाबदारी आहे.

- न्यू हायस्कूल, थर्मल विभाग,
परळी-वै. (मो.९८२२२६७७६६)

# गुरूदेव की छात्रछाया में

**- नरेश शास्त्री**
**(गुरूकुल स्नातक)**

१४ जून १९९६ इ.स. को श्रद्धानंद गुरूकुल में कक्षा पाँचवी में मैं पहले छात्र प्रविष्ट हुआ। धीरे-धीरे छात्र आते गए, गुरूकुल की संख्या बढती गयी। गुरूकुल के विषय में मुझे पिताजी ने बहुत कुछ बताया था, महर्षि दयानन्द और आर्य समाज के विषय में भी। यहाँ आने पर मुझे इन सभी बातों का साक्षात्कार हुआ। वैदिक विचारधारा को सुचारू रूप देने वाले पूज्य आचार्य श्री शिवमुनिजी वानप्रस्थी, जिनके चरण कमलों में बैठकर हम सभी छात्र स्नातकों ने विद्याध्ययन किया हैं। इनका संपूर्ण जीवन अध्यापन कार्य में व्यतीत हुआ। आदर्श विचार, तपस्वी जीवन रहा है। ऐसे महान गुरूवर्य आचार्यजी का अमृत महोत्सव सभी छात्र स्नातकों की उपस्थिति में हो रहा है, यह हम सभी के लिए आनन्द व गौरव का विषय है।

गुरूकुल के प्रारंभ में अनेक समस्यायें थी, उनका निवारण बडी सूझ-बूझ के साथ किया व गुरूकुल को महाराष्ट्र का **'आर्ष विद्या का केंद्र'** बनाया। आचार्यजी ने गुरूकुल में रहते समय हमें कभी माता-पिता की याद आने नहीं दी। वे सभी से समानता का व्यवहार करते थे। घर की परिस्थिति को समझकर ही छात्रों से शुल्क लिया करते थे, जिनकी घर की आर्थिक परिस्थिति सामान्य है, उन्हें नि:शुल्क रहने की व्यवस्था करते थे।

गुरूकुल की दिनचर्या व नियम काफी कठोर होते हैं। प्रात: काल ४ बजे उठना, व्यायाम करना, संध्या-हवन, अध्यापन, श्रमदान, खेल बिलकुल व्यस्त दिनचर्या होती है। इसलिए छात्र कभी-कभी भागकर जाते थे। भागनेवाले छात्र को कठोर दण्ड दिया जाता था, जिससे वह छात्र न भाग सके। मैं भी एक बार भाग गया, पिताजी व विशारद गुरूजी ने समझाया, फिर मै गुरूकुल वापिस आ गया। मुझे भी दण्ड मिला। अच्छी पढाई के कारण पांचवी कक्षा से सीधे सातवी में बिठानेवाले थे, परन्तु भाग जाने की वजह से छठी कक्षा में बिठाया गया। तभी मुझे लगा कि यदि मैं भाग न जाता, तो एक कक्षा से मैं आगे रहता। मैने विचार किया कि आज के बाद कभी भी न भागूंगा। आचार्यजी दण्ड भी देते थे, जिससे छात्रों

को समझ आये,  वे बाद में गलती न करें।

आचार्यजी के सान्निध्य में मुझे नौ वर्ष रहने का अवसर मिला।स्वयं दिनचर्या व नियमों का पालन करते थे। उनसे हमें काफी शिक्षा, ज्ञान प्राप्त हुआ है, जिनमें से कुछ अध्यापक, पुरोहित, उपदेशक व योगशिक्षक के रूप में सेवा दे रहे हैं। आचार्यजी ने सभी के कल्याण के लिए गुरूकुलीय व्यवस्था बनायी व उसे सुचारू रूप से चलाया है। यह गुरूकुल पहाडी क्षेत्र में होने से यहाँ सांप, बिच्छू आदि का डर बना रहता था। कई बार बच्चों के बिस्तर में सांप निकले, कईं बार सिरहाने पर बिल्लियों ने सांप को मारकर टुकडे किये हुए दिखायी दिये। कई बार बिच्छू ने छात्रों को काट लिया, तब रातभर जगकर आचार्यजी व विज्ञानमुनिजी दवाई करते थे। कई बार छात्र बीमार होते, तो आचार्य जी स्वयं उनको आकर उनका इलाज करते थे। जितना हमारे माता-पिता भी ध्यान नहीं देते, उससे कई अधिक गुणा आचार्यजी ध्यान देते रहे हैं। हम सभी छात्र स्नातक आचार्यजी के ऋणी हैं। इनके ऋण से उऋण होना संभव नहीं हैं।

आचार्यजी के जीवन के विषय में लिखना मुझ जैसे सामान्य छात्र का विषय नहीं है। उनका जीवन अनंत सागर की तरह विशाल है। अमृत महोत्सव के उपलक्ष्य में आचार्यजी के प्रति हम सभी गुरूकुल के स्नातक कृतज्ञता व्यक्त करते हुए प्रभु से ''भूयश्च शरदः शतात्'', यह प्रार्थना करते है।

-श्रद्धानंद गुरूकुल आश्रम,
नंदागौल मार्ग, परली-वै.
मो.९८९०९९८५७०



कार्यक्रम वृत्तांत

# औराद आर्य समाज भवनाचे उद्घाटन आणि आचार्य शिवमुनिजींचा अमृतमहोत्सव समारंभ (रविवार दि. २४ एप्रिल २०११)

- 'राष्ट्र व समाज निर्मितीत आर्य समाजाचे मोठे कार्य' - आलुरे गुरूजी
- 'आचार्य शिवमुनिजी सारखे आजीवन ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक लाखात एखादेच सापडतील - स्वामी श्रद्धानन्दजी
- 'आर्य समाजाच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही'.

  - आचार्य शिवमुनी

'महर्षी दयानंदांनी स्थापन केलेल्या 'आर्य समाज' या चळवळीने राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक कार्यात आणि मानवीय मूल्यांच्या संवर्धनात सर्वाधिक योगदान दिले असून चारित्र्यसंपन्न समाज घडविण्याच्या कामी ही संस्था अग्रणी ठरली आहे. आचार्य शिवमुनिजींसारखे त्यागी व समर्पित असे ध्येयनिष्ठ शिक्षक व समाजसेवक याच संस्थेने दिले.' असे उद्गार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्ते, माजी आ.श्री.सि.ना. आलुरे गुरूजी यांनी काढले.

उमरगा तालुक्यातील औराद (गुंजोटी) येथील आर्य समाजाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन समारंभात व प्रांतीय आर्य प्रतिनिधी सभेचे माजी मंत्री आचार्य श्री शिवमुनिजी (मयाचारी गुरूजी) यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात श्री आलुरे गुरूजी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान स्वामी श्रद्धानन्द सरस्वती हे होते.

या प्रसंगी सर्वश्री आ.ज्ञानराज चौगुले, माजी आ.प्रा. रवीन्द्र गायकवाड, डॉ.दा.ब.पतंगे, डॉ.महाजन, सभामंत्री राजेंद्र दिवे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. आलुरे यांनी आपल्या विस्तृत भाषणात आर्य समाजाच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले- 'हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनात आर्य समाज या चळवळीने मोठे योगदान दिले आहे. विशेषत: मराठवाड्यातील आर्यांनी या कामी फार मोठे बलिदान दिले आहे. त्याबरोबरच शिक्षण प्रसार, चारित्र्यनिर्मिती व राष्ट्रीय भावनांचा उदय

स्वामी दयानंदाच्या याच चळवळीतून झाला. आज खऱ्या अर्थाने पुन्हा या विचारांची गरज आहे.कारण स्वातंत्र्यानंतर पाश्चात्य भोगवादी विचारांनी देशात सर्वत्र थैमान घातले आहे. नव्या पिढीने आर्य समाजाचे विचार स्वीकारून आपल्या जीवनाचा सर्वंकष विकास घडवून आणावा.

आचार्य शिवमुनिजींच्या जीवन व कार्याविषयी गौरवोद्गार काढून ते म्हणाले, ''मयाचारी गुरूजींसारखे निष्ठावान आर्य समाजी व एक कर्तव्यदक्ष शिक्षक समाजाला लाभतात, तेंव्हा चांगली पिढी उदयास येत असते. शिक्षण सेवेसाठी त्यांनी वाहीलेले समर्पित जीवन नवा समाज घडविण्यासाठी खूपच प्रेरणादायी आहे. परमेश्वर गुरूजींना उदंड आयुष्य देवो, अशी प्रार्थना!'

आ.ज्ञानराज चौगुले यांनी उमरगा तालुक्यात आर्य समाजाचे प्रसारकार्य ऐतिहासिक असल्याचे सांगून औराद व गुंजोटी या दोन गावातील थोर क्रांतिकारकांनी व समाजसुधारकांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

डॉ.दा.ब.पतंगे म्हणाले - 'मयाचारी गुरूजींसारखे हाडाचे व कडक शिस्तीचे शिक्षक आमच्या श्रीकृष्ण विद्यालयाला मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो. त्यांनी दिलेल्या सेवेमुळे संस्थेची शैक्षणिक भरभराट झाली. आजवर विविध क्षेत्रात आघाडीवर असलेल्या शाळेच्या असंख्य माजी विद्यार्थ्यांमागे मयाचारी गुरूजींसारख्या सचोटीच्या शिक्षकाची शिकवण शिदोरीच्या रूपाने आहे.'

डॉ. महाजन यांनी आपल्या भाषणात आर्य समाज म्हणजे एक परीस असल्याचे सांगून वैदिक तत्त्वज्ञानाची आज देशाच्या सर्वांगिण विकासासाठी गरज असल्याचे सांगितले व शिवमुनिजींना अमृत महोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या.

माजी आ.श्री रवींद्र गायकवाड यांनीही या प्रसंगी शिवमुनींच्या कार्याचा गौरव करून त्यांचे विषयी अभीष्ट चिंतीले.

प्रांतीय आर्य प्रतिनिधी सभेचे मंत्री श्री राजेंद्र दिवे यांनी श्री शिवमुनिजींनी आर्य समाज व सभेला दिलेल्या सेवेचा गौरव केला. ते म्हणाले- 'आचार्यजींचा जीवन यज्ञ सर्वांसाठी प्रेरणाप्रद आहे. त्यांनी आर्य समाजाच्या प्रसारात व प्रांतीय सभेच्या सवंर्धनकार्यात फार मोठे योगदान दिले आहे.'

डॉ. ब्रह्ममुनिजी यांनी आर्य समाज औराद च्या नव्या भवनातून गावातील मुला-मुलींसाठी संस्कारांचे वर्ग सुरू करण्यात यावेत व पूर्वीप्रमाणेच या गावात अधिक प्रमाणात विशुद्ध वैदिक विचारांचे वातावरण निर्माण व्हावे. ही जबाबदारी आचार्य शिवमुनिजींनी स्वीकारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. 'आर्य विचारांची

सध्या समाज व राष्ट्राला मोठी गरज असून प्रत्येक आर्य कार्यकर्त्याने कार्याला वाहून घेतले पाहिजे'. असेही ते याप्रसंगी म्हणाले.

श्री दिनकररावजी देशपांडे यांनीही शिवमुनिजीच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या विषयीच्या कांही आठवणींना उजाळा दिला व त्यांचे दीर्घायुष्य चिंतीले.

आर्य समाज जीर्णोद्धार व आचार्य शिवमुनिजी गौरव समितीच्या वतीने प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका दिवंगत शांतिदेवी मायर (लंडन) यांच्या आर्थिक सहकार्याने व लातुर लोकसभा मतदार संघाच्या तत्कालीन खा.रूपाताई पाटील निलंगेकर यांच्या खासदार फंडातून बांधण्यात आलेल्या **'आर्य समाज, औरादच्या नव्या भवना'**चे उद्घाटन ही यावेळी वरील मान्यवरांच्या हस्ते पार पडले.'

श्री शिवमुनिजींच्या अमृतमहोत्सवानिमित्त गौरव समितीद्वारे संकलित करण्यात आलेला गौरवनिधी, सन्मान पत्र, शाल, पुष्पहार अर्पण करून त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. गौरवस्वरूपात प्राप्त दीड लाखा(रू.१,५०,०००/-) च्या भेटनिधीत आचार्यजींनी स्वत:जवळील अकरा हजार एकशे अकरा (रू. ११,१११/) रूपये मिसळून हा पूर्ण एक लाख **एकसष्ठ हजार एकशे एक (रू.१,६१,१११)** रूपयांचा निधी वेदप्रचारासाठी आर्य समाज औरादच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला. या विधायक कार्याबद्दल उपस्थित मान्यवर विद्वानांनी व औरादच्या कार्य कार्यकर्त्यांनी आचार्यजींचे व गौरवसमितीचे अभिनंदन करून आभार मानले.

सत्काराला उत्तर देतांना शिवमुनींजींनी आर्य समाजाचे ऋण व्यक्त करून **'या मोठ्या ऋणातून उतराई होणे कदापी शक्य नाही. यापुढे आर्य समाज औराद व परिसरात यथाशक्ती प्रचार कार्य करीत राहू'**, असे उद्गार काढले. यावेळी त्यांनी डॉ. पतंगे यांची आठवण करून भयंकर आजारावर उपचार करीत तीन वेळा मृत्यूंच्या दाढेतून वाचविल्याबद्दल यांचे विशेष आभार मानले व त्यांचे विषयी भावनाविवश होऊन कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या प्रेमापोटी या समारंभात आलेल्या जनसमुहाचे धन्यवाद मानतांना आचार्यजींचे हृदय भरून आले व शेवटी भरल्या अंत:करणानेच आपल्या भाषणाला पूर्ण विराम दिला.

अध्यक्षीय समारोप करतांना स्वामी श्रद्धानंदजी यांनी शिवमुनी यांचा 'एक आदर्श शिक्षक व क्रियाशिल आर्य समाज-प्रचारक' म्हणून गौरव केला.

स्वामीजी म्हणाले - ''शिवमुनींसारख्या व्यक्ती सध्याच्या युगात लाखात एखाद्याच सापडतील. अगदी लहानपणापासूनच ते माझ्या सान्निध्यात राहीले. सत्यग्राहीवृत्ती असल्याने मी त्यांना वैदिक सिद्धांत सांगत गेलो व ते बनत गेले. पहिल्या फळीतील असे सुयोग्य शिष्य मिळाल्याचा मला सार्थ अभिमान आहे.''

'शिक्षकी पेशातून निवृत्त झाल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी असतांना देखील त्यांनी वानप्रस्थ दीक्षा घेतली व गुरूकुल परळी आणि आर्यसमाजाला वाहून घेतलो. ते ही कोणाकडूनही आर्थिक मदत न घेताच! केवढे मोठे हे औदार्य आहे. त्यांच्या या कार्यात त्यांच्या कुटुंबियांनी फार मोठे योगदान दिले आहे. शिवमुनीसारख्या व्यक्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या तर निश्चितच वैदिक धर्माचा प्रचार वेगाने होईल,' असा आशावाद स्वामीजींनी व्यक्त केला. पाटील बंधू (गुणवंत व आण्णाराव) अर्जुनराव सोमवंशी व माधवराव चव्हाण यांचे फार मोठे सहकार्य लाभल्याची आठवण करून दिली.

यावेळी आचार्य शिवमुनींच्या गौरवार्थ प्रकाशित करण्यात आलेल्या **'ज्ञानव्रती'** या गौरवग्रंथाचे व त्यांनी लिहीलेल्या **'उपनिषदसार'** या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. ग्रंथाची भूमिका संपादक डॉ.नयनकुमार विशारद यांनी मांडली. प्राचार्य वेदमुनिजींनी उपनिषदांचे महत्त्व विशद करून सदरील ग्रंथाविषयी माहिती सांगितली.

दरम्यान या कार्यक्रमानिमित्त पं.सुधाकरजी शास्त्री यांच्या ब्रह्मत्त्वाखाली त्रिदिनात्मक **'यजुर्वेद पारायण यज्ञा'**चे आयोजन करण्यात आले. यात पं.राजवीरजी शास्त्री व इतरांची व्याख्याने पार पडली. श्रद्धानन्द गुरूकुलाच्या ब्रह्मचाऱ्यांनी वेदपाठ केला.

कार्यक्रमाचे संचलन श्री रघुरामजी गायकवाड यांनी केले तर आभार श्री विक्रम मयाचारी यांनी मानले. कार्यक्रमाच्या सफलतेसाठी सर्वश्री प्रा.शिवाजीराव गायकवाड, राजेंद्र पाटील, बळीराम सूर्यवंशी, रघुराम गायकवाड, गुणवंतराव सा.पाटील, गुणवंत मा.पाटील रामराव सनातन, दिलीप मयाचारी, तानाजी शास्त्री यांच्या सह आर्य कार्यकर्ते व मयाचारी परिवाराने परिश्रम घेतले. कार्यक्रमास मराठवाड्यातील ठिकठिकाणाहून आलेले आर्य कार्यकर्ते, चाहते, मित्र, विद्यार्थी,ग्रामस्थ उपस्थित होते.

# आर्य समाज औराद-भवन उद्घाटन व अमृत महोत्सव समारंभ



विचार व्यक्त करतांना डॉ. महाजन



मार्गदर्शन करतांना डॉ.दा.ब.पतंगे

# आर्य समाज औराद-भवन उद्‌घाटन व अमृत महोत्सव समारंभ




आ.ज्ञानराज चौगुले यांचे भाषण




माजी आ. रविंद्र गायकवाड यांचे मार्गदर्शन




स्वामी श्रद्धानन्दजी, आलुरे गुरूजी, आ.चौगुले, माजी आ. गायकवाड व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते आचार्य शिवमुनिजी यांचा दीड लाख रूपयांचा गौरवनिधी व मानपत्र प्रदान करून सपत्नीक सत्कार करण्यात आला.



आचार्य शिवमुनिजींनी आपल्या गौरवार्थ प्राप्त निधीत आपल्यातर्फे रू ११,१११/- घालून एकुण रू.१,६१,१११ ची थैली आर्य समाज औराद करिता वेदप्रचारासाठी गौरव समितीकडे सुपूर्द केली.



आर्य समाजाचा गौरव व मयाचारी गुरूजी (शिवमुनिजी) चे अभिनंदन करतांना माजी आ.सिद्रामप्पा आलुरे गुरूजी


# ग्रंथ प्रकाशन



अमृतमहोत्सवानिमित्त गौरव समितीतर्फे काढण्यात आलेल्या **'ज्ञानव्रती - आचार्य शिवमुनी'** या अभिनन्दन ग्रंथाचे प्रकाशन माजी आ.आलुरे गुरूजी यांच्या हस्ते करण्यात आले!



आचार्य शिवमुनिलिखीत 'उपनिषद सार' या ग्रंथाचे प्रकाशन प्राचार्य वेदकुमार वेदालंकार (वेदमुनिजी) यांनी केले.



सत्कार मूर्ती दांपत्य-आचार्य शिवमुनी (शं.भी.मयाचारी) व सौ. मंगलाबाई

# गुरूकुल आमसेना (उडीसा) द्वारा दि.८ फरवरी २००४ को किये गये
# गौरव समारोह में दिया गया अभिनन्दन पत्र

ओ३म्



श्रद्धालु, ऋषिभक्त, उदारमना, सादा जीवन उच्चविचार की ज्वलन्त प्रतिमा, वैदिक विचारधारा से ओतप्रोत, वानप्रस्थ विभूषण श्री शिवमुनि जी की सेवा में सादर समर्पित.....

## अभिनन्दन पत्रम्

**हे सौम्य मूर्ति !** आपका जन्म सन् १९३३ में पिता श्री भीमराय समाधारी, माता राधाबाई के घर ग्राम औरव, जिला- धाराशिव (महाराष्ट्र) में हुआ। आप बाल्यावस्था से ही पूज्य स्वामी श्रद्धानन्द जी (पूर्व नाम हरिश्चन्द्र गुरुजी) की प्रेरणा से आर्यसमाज के प्रति आकृष्ट हुए तथा आर्यकुमार सभा के माध्यम से प्रारंभिक कार्य करने के उपरान्त स्थानिय आर्यसमाज के मंत्री, प्रधान आदि विभिन्न पदों पर कार्य करते हुये वैदिक धर्म के लिए तन-मन एवं धन से जुट गए एवं २३ वर्ष की आयु में गृहस्थ आश्रम में प्रवेश किया, तथा महाराष्ट्र में वैदिक धर्म की दुन्दुभि बजाने लगे।

**हे आदर्श शिक्षक !** आपने सीनियर हिन्दी शिक्षक की उपाधि तथा (बी.ए.आनर्स) की उपाधि प्राप्त कर विद्यालय एवं महाविद्यालयों में संस्कृत एव हिन्दी का अध्यापन करते हुए अनेक योग्य छात्रों को आदर्श छात्र के रूप में निर्माण कर समाज को दिया, जिसको छात्र समाज कभी भूल नहीं सकता।

**हे आर्य सिद्धान्त रक्षक !** आदर्श वर्णाश्रम की परम्परा का पालन करते हुए " अथातो अमानुषः " के आदेश को अक्षरशः चरितार्थ करते हुए सेवा निवृत्त के पश्चात् १९९६ में स्वामी केवलानन्द जी से तृतीय आश्रम में प्रवेश करके वैदिक धर्म के प्रचार प्रसार में जुट गए, जिसका प्रभाव महाराष्ट्र में सर्वत्र पड़ रहा है।

**हे आर्य शिक्षा के प्रेमी !** सेवा निवृत्ति से पहले आपमें एक तथ्य थी कि एक आर्य गुरुकुल खोला जाए अथवा किसी गुरुकुल में अवैतनिक सेवा दी जाए। आपके के इस प्रयत्न सुसंकल्प को आर्य समाज परली ने पूर्ण रूप दिया। इस समाज के प्रमुख कार्यकर्ता सर्वश्री दौलतरावजी गिरवलकर (संरक्षक), रामचलजी मोहिया (प्रधान), ऊमेशजी राठौर (मन्त्री) तथा डॉ. ब्रह्ममुनिजी (पूर्व सभामन्त्री) इनसे विचारविमर्श होकर आर्य समाज परली की ओर से आर्य गुरुकुल स्थापन करने का निश्चय हुआ। तदनुसार सन् १९९६ से आप इस गुरुकुल के संस्थापक आचार्य के रूप में सेवा दे रहें हैं। आर्य परम्परा के अनेक ब्रह्मचारियों के निर्माण में लगे हुए है तथा सम्प्रति आप महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के महामन्त्री पद को भी विभूषित कर रहे हैं।

**हे साहित्य प्रेमी !** आपकी वैदिक साहित्य के प्रति अटूट निष्ठा देखते ही बनती है, इसका प्रतिफल सामने है कि आपने संध्या यज्ञ प्रकाश एवं महात्मा नारायण स्वामी जी के द्वारा लिखित विद्यार्थी जीवन रहस्य का मराठी में अनुवाद कर सन् १९७० में गुंजोटी में आयोजित मराठवाड़ा आर्य महासम्मेलन के सुअवसर पर प्रकाशित किया। आप इस सम्मेलन के स्वागतमंत्री भी रहे।

**हे आदर्श साधक !** आपकी वैदिक सिद्धान्तों के प्रति दृढ निष्ठा है ही, साथ-साथ में योग साधना में भी आपकी विशेष रूचि है। आपके ऐसे सभी गुणों से अभिभूत होकर हम आपका सम्मान करते हुए अपने आप को गौरवान्वित अनुभव कर रहे हैं। भगवान् आपको अच्छा स्वास्थ्य एवं दीर्घायु प्रदान करें जिससे समाज आपसे अधिक लाभान्वित होकर अज्ञानान्धकार से अपने को दूर रख सके। इन्हीं शुभकामनाओं सहित..........

हम हैं आपके

परममित्र मानव निर्माण न्यास एवं गुरुकुल आश्रम आमसेना के सभी अधिकारी एवं सदस्य गण

फाल्गुन कृष्ण द्वितीया विक्रमाब्द २०६० तदनुसार दिनांक ८-२-०४ रविवार, दयानन्दाब्द १८०




## गुरूकुल आमसेना (उडीसा) द्वारा दि.२० फरवरी २००५ को किये गये

# गौरव समारोह में दिया गया अभिनन्दन पत्र

॥ ओ३म् ॥

*संसार में उन्हीं का नाम अजरामर होता है, जो सदैव परोपकार एवं समाजके कल्याण में अपना जीवन व्यतीत करते हैं, ऐसे ही परोपकारियों की श्रृंखला को सुशोभित करने वाले मानवता के पुजारी*

# पू.आचार्य शिवमुनिजी



## ॥ गौरवपत्र ॥

औराद(शं.) जैसे छोटेसे गांव में आपका जन्म होते हुए भी आपने अनेको अद्भुत कार्य किए। बाल्यावस्था से ही गुरूदेव स्वामी श्रद्धानन्दजी के पदचिन्हों पर चलते हुए आपने छात्रावस्था में 'आर्य कुमार सभा', तथा प्रौढावस्था में आर्य समाज व महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के संघठन, मानवता संस्कार शिविर सफल बनानें में अग्रणी रहें हैं।

अध्यापक से लेकर आचार्य पद को अलंकृत कर आपने अनेको चरित्रवान्, क्षमाशील् एवं कर्तव्यदक्ष युवकों का निर्माण कर 'शिक्षक' शब्द की गरीमा को बढाया है।

ब्रह्मचर्य की सीढी यश व कीर्ति के साथ चढकर 'गृहस्थाश्रम' को सफल बनाते हुए आप सम्प्रति 'वानप्रस्थाश्रम' का भवन सुशोभित कर रहे हैं।

ऐसे महापुरूष का गौरव करते हुए आर्य परली वै. अपने आपको धन्य समझ रहा है। ईश्वर से आपके आयुरारोग्य की कामना कर, श्रद्धावनत होकर, यह 'गौरवपत्र' आपके चरणारविन्दों में समर्पित करता है

आर्य समाज परली वैजनाथ

माघ शु. १२ वि.सं. २०६१-रविवार दि. २०/२/२००५

पूज्य हरिश्चंद्रजी गुरूजी (स्वामी श्रद्धानन्दजी) के सुयोग्य शिष्य के रूप में दि.११ जून २००६ को गौरव समारोह में प्राप्त

# सम्मानपत्र





॥ ओ३म् ॥

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा अंतर्गत
'स्वामी श्रद्धानंद (हरिश्चन्द्र गुरुजी)
गौरव समिति' द्वारा

विद्यार्थियों के शिल्पकार एवं तपस्वी सन्यासी
स्वामी श्रद्धानंद (हरिश्चन्द्र गुरुजी) के परमशिष्य

## आचार्य शिवमुनिजी (श्री शं.भी.मयाचारी)

की सेवामें सादर समर्पित


## सम्मान पत्र

समाज एवं राष्ट्र के सुधार हेतु अपना सर्वस्व आहुत करनेवाली सत्पुरुषोंकी मौत्तिक माला को सुशोभित करनेवाले आचार्य शिवमुनिजी का समग्र जीवन समर्पण एवं त्याग से भरा है। महान क्रांतिकारियों की पावन भूमी 'औराद' तहसील उमरगा के 'मयाचारी' परिवार में जन्में शंकर अर्थात शिवमुनिजी ने जीवनभर प्रेरणाप्रद कार्य कियें हैं। सौभाग्य से आपको बचपन से ही महान विद्यार्थी सुधारक पूज्य हरिश्चन्द्र गुरुजी का सान्निध्य मिला। इससे आपका जीवन सद्‌विचारोंसे सुरभीत होता रहा। आर्य समाज कि 'आर्य कुमार सभा' का आपने विद्यार्थी अवस्था से नेतृत्व किया।

हे आचार्य प्रवर ! पूज्य गुरुजी के पदचिन्हों पर चलकर आपने आर्य समाज के प्रचार एवं प्रसार में बहुमुल्य योगदान दिया है। आपके शैक्षिक, सामाजिक एवं ग्रामसेवा आदि कार्यों को समाज कभी विस्मृत नही कर सकता। विद्योपासना एवं विद्यादान के पवित्र कार्य में आप सदैव अग्रणी रहे। अमृतभाषा संस्कृत की ज्ञानसरिता आपने छात्रों मे प्रवाहित की। आर्य जगत आपने दी हुई सेवाएं बहुतही प्रेरणादायी हैं। अध्यापन कार्य से निवृत्त होकर आपने 'गुरुकुल सेवा' का व्रत धारण किया, जिसे परली के आर्योंने पूर्ण किया। १९९६ में आपने परिवार का उत्तरदायित्व रहते हुए भी 'वानप्रस्थ आश्रम' में प्रविष्ठ हुए। गत दस वर्षों से आप स्वामी श्रद्धानंद गुरुकुल आश्रम, आर्य समाज, परली-वैजनाथ के संस्थापक आचार्य के रुप में सेवा दे रहे हैं। गत तीन वर्षों से आप महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के मंत्रिपद का भार बडी कुशलता से वहन कर रहे है।

महर्षि दयानंद के वैदिक मार्ग पर चलनेवाले हे पथिक ! आपकी बहुमूल्य सेवाओं के प्रति हम कृतज्ञता प्रकट करते हैं। श्रद्धेय स्वामीजी के सुयोग्य शिष्य के रुप में हम आपका अभिनन्दन कर श्रद्धा के साथ यह सम्मानपत्र समर्पित करते हैं। परमात्मा से आपके उत्तम स्वास्थ्य एवं पूर्ण दीर्घायुकी कामना।

ज्येष्ठ पूर्णिमा, शक सं. १९२८,
दिनांक ११ जून २००६, रविवार



आपके ही प्रिय
सहयोगी मित्र, शिष्यगण एवं आर्य जन
**स्वामी श्रद्धानंद गौरव समिति**
**महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा**

## अमृत महोत्सव के उपलक्ष्य में जन्मभूमि औराद में दि.२४ अप्रैल २०११ को आयोजित सम्मान समारोह में प्राप्त

# अभिनन्दन पत्र





॥ ओ३म् ॥

राष्ट्रसेवा व शिक्षण प्रसारात समर्पित नररत्न, आमचे आदर्श

**आचार्य शिवमुनिजी (श्री. शंकरराव श्री. ब्रह्मचारी)**

यांच्या अमृत महोत्सवा निमित्त समर्पित

## गौरवपत्र

हे मनिषी !

१९३३ ला 'औराद' या खेड्यात जन्माला येऊन पू. हरिश्चंद्र गुरूजींच्या सहवासाने वैदिक विचारांचा लळा लागला व तो इतका दृढ झाला की, 'माणसाला माणूसपण शिकविण्यासाठी या तत्वांची नितांत गरज आहे म्हणून नवयुवकांना संगठित व संस्कारित केले. त्यातूनच आर्य-कुमार सभा, मानवता संस्कार शिबिर या संकल्पणा पुढे आल्या उमेदीच्या काळात तर स्वतःच्या शिक्षणामुळे जरी आपणास प्रत्यक्ष आंदोलनात सहभागी होता आले नसले, तरी हिंदी सत्याग्रह, गोवा मुक्तिसंग्राम, गोहत्या बंदी आंदोलनांमध्ये सहभागी झालेल्या आंदोलकांना भूमिगत राहुन सहयोग देण्याचे अनमोल कार्य आपण केले.

हे उदारमना !

१९७१ मध्ये मराठवाडा विभागीय 'आर्य महासंम्मेलन' यशस्वी करून, दीर्घकाळापर्यंत आर्य समाजाच्या मंत्रीपदापासून ते महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेच्या मंत्री पदापर्यंत अनेक महत्वपूर्ण पदे निःस्पृहपणे भूषविली. चीनचे आक्रमण झाले असता 'राष्ट्रीय सुरक्षा कोषाची' स्थापना करून जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम वाजत-गाजत गावचा निधी जमा करण्याचे श्रेय आपणांस जाते. 'शिक्षक' म्हणून कार्य करत असतांना स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाच्या प्रभावाने 'गुरूजी' शब्दाची प्रतिष्ठा वाढविलात. ती आजतागायत टिकून आहे.

हे आचार्यप्रवर !

सामान्यांना अनभिज्ञ असलेल्या देववाणीचा परिचय ग्रामीणभागात सर्वप्रथम करुन देऊन शेकडो संस्कृत प्रचारक अनुयायी तयार केले जे की, आज देश-विदेशामध्ये या समृद्ध भाषेची महिमा वृद्धिंगत करीत आहेत. याचे सर्व श्रेय केवळ आपल्याकडेच जाते. आपल्या विशाल परिवाराची धुरा यशस्वीपणे सांभाळून त्यातच न रमता अगदी सेवानिवृत्ती नंतर वानप्रस्थाची दीक्षा घेऊन गुरुकुलाचे 'आचार्यपद' सांभाळून राष्ट्रसेवेपेक्षा परिवार तोकडा असतो हे आर्यजगताला पटवून दिले.

हे मुनिवर्य !

मृदुभाषी, मितभाषी परंतु कर्मठ अशी आपली ओळख. 'विद्या विनयेन शोभते, विद्या ददाति विनयम् , गुणाः गुणज्ञेषु गुणाः भवन्ति' या सुवचनांचे मोठेपण आपल्या सारख्या सत्पुरूषामुळेच वृद्धिंगत होते. आपल्या आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या आपल्या महान कार्याची उतराई कदापि होणार नाही, परंतु आम्हां सर्वांना आपल्या सारख्या महात्म्याचा सहवास व मार्गदर्शन दीर्घकाळ लाभत राहो, यास्तव ईश्वरचरणी दीर्घायुरारोग्याची त्रिवार प्रार्थना करुन आम्ही शतशःनमन करतो.


### ॥ जीवेत् शरदः शतम् ॥

| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| प्रा. शिवाजीराव गायकवाड | बलीराम सूर्यवंशी | राजेंद्र पाटील |

व सर्व सदस्य

आचार्य शिवमुनी अमृतमहोत्सव गौरव समिती, औराद

**समस्त ग्रामस्थ, आर्य समाज, औराद, ता.उमरगा जि.धाराशिव**



गुरुवर्य स्वामी श्रद्धानंदजी व जीवलग मित्र डॉ.ब्रह्ममुनिजी समवेत



परळी आर्यसमाजात एका दीक्षा समारंभात स्वामी सर्वानंदजी, पं.राजेंद्र जिज्ञासू, संन्यासी, वानप्रस्थी व आर्य कार्यकर्त्यां समवेत शिवमुनिजी (मध्यभागी उभे)



आधारवडाच्या छत्रछायेत संपूर्ण मयाचारी कुटूंब. (चि.विकासच्या विवाह प्रसंगी)



श्रीकृष्ण विद्यालयातील एका कार्यक्रमात मयाचारी गुरुजींचा सत्कार करतांना संस्थेचे सचिव व सामाजिक कार्यकर्ते डॉ.पतंगे




आर्य समाज परळी तर्फे १५ हजार रु.ची थैली प्रदान करुन शिवमुनींचा सपत्नीक सत्कार करतांना श्रीमती कैलाश भसीन (लंडन). सोबत शांतिदेवी मायर व आर्य समाज परळी चे पदाधिकारी.




स्वामी श्रद्धानंद गौरव समारंभात 'आदर्श शिष्य' म्हणून शिवमुनिजींचा गौरव करतांना आर्य जगताचे स्वामी धर्मानंदजी, ब्र.राजसिंहजी, डॉ.धर्मवीरजी, ब्र.नंदकिशोरजी, श्री साळुंखे आदी.